

# वाटा आरोग्याच्या विकासाच्या

# वाटा आरोग्याच्या विकासाच्या

• लेखक •

**श्री. भारत गजेंद्रगडकर**

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन


- **पुस्तकाचे नांव**
  वाटा आरोग्याच्या विकासाच्या

- **प्रथम आवृत्ती :**
  डिसेंबर २००७

- **मुखपृष्ठ :**
  नागेश करपे

- **अक्षर जुळणी व मांडणी :**
  मुरली आडम

- **आतील शिर्षक :**
  हेमंत कपूरे, सोलापूर.

- **मुद्रक :**
  महेश बिराजदार
  संप्रति ऑफसेट प्रिंटर्स
  ६२–अ, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर.
  फोन : ०२१७–२३२९८२५
  **E-mail :** samprati2006@yahoo.co.in

- **मूल्य : रु. ५०/–**

- **प्रकाशक :**
  हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदूर
  ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद–४१३ ६०३.
  दूरध्वनी : ९१–२४७१–२४६०५०
  २४६१८२–२४६३८४
  **E-mail :** shashikant.hmf@gmail.com **Website :** www.halomedicalfoundation.org



# प्रस्तावना....

एक प्रचंड मोठा पण साधा मंडप, त्यात सुमारे साडेचार हजार ग्रामीण स्त्रिया शिस्तीनं बसलेल्या आहेत. बडबड गडबड न करता, व्यासपीठावरुन चाललेली भाषणं शांततेनं ऐकताहेत. अनुभव कथनाच्या कार्यक्रमात ध्वनिक्षेपकापुढे धिटाईनं उभं राहून आपल्या ग्रामीण बोलीत आपली दुखणी खुपणी, गाऱ्हाणी सांगताहेत. आपण यशस्वारीत्या पार पाडलेल्या उपक्रमांची माहिती देताहेत.... दुपारी भोजनाच्या सुट्टीत आपापली गाठोडी सोडून दशम्या खातात आणि खाणं संपल्यावर पुन्हा मांडवात वेळीच येऊन बसतात. एवढ्या जणींचं खाणं पिणं झालं म्हणून कुठे उष्टखरकटं सांडलेलं नाही की प्लॅस्टिकच्या पिशव्या, पत्रावळी, कागद पडलेले नाहीत. सार्वजनिक, सामुदायिक वर्तनात कुठेही वावगेपणा नाही.... हे सर्व पाहाणं हा एक आगळा अनुभव होता. दोन वर्षांपूर्वी संजीवनी बचत संघाच्या वार्षिक मेळाव्याला उपस्थित राहण्याची संधी मला लाभली, तेंव्हा मी हे सर्व पाहिलं.

१९८० साली हॅलो (HALO - Health and Auto Learning Organisation) चळवळीची सुरुवात झाली. त्यावेळी कार्यकर्त्यांनी केलेल्या सर्वेक्षणातून घेतलेल्या वैद्यकीय शिबिरातून ग्रामीण आरोग्याचे, विशेषत: ग्रामीण–स्त्री आरोग्याचे उग्र वास्तव कार्यकर्त्यांना जाणवलं आणि हॅलो मेडिकल फाऊंडेशनची स्थापना झाली.

हॅलो चळवळीचे प्रमुख उद्‌गाते आणि सूत्रधार डॉ. शशिकांत आणि डॉ. सौ. शुभांगी अहंकारी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनं ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी हॅलो मेडिकल फाऊंडेशनद्वारे विविध उपक्रम आखले आणि ते यशस्वीरीत्या पार पाडले. त्यातून उभी राहिली ग्रामीण आरोग्याची, ग्रामीण विकासाची एक सशक्त प्रणाली. खरं तर 'ग्रामीण विकासाचा मार्ग ग्रामीण आरोग्यातून जातो' अशी घोषणा तयार व्हावी अशी ही प्रणाली 'वाटा आरोग्याच्या विकासाच्या' या पुस्तकातून नजरेस येते. घरातील एका स्त्रीने

आरोग्याबाबत जागृती केली तर ती किमान तिच्या घराचे आरोग्य सांभाळू शकेल, या विचाराने स्त्रियांच्या आरोग्य प्रशिक्षणाची सुरुवात केली आणि मग गावातील आरोग्याचे प्रश्न गावातच सोडवावेत म्हणून गावातलीच अल्पशिक्षित स्त्री निवडून तिचे अधिक विस्तृत प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरु झाला. यासाठी खास अभ्यासक्रम 'भारत वैद्यक' तयार झाला. परिणामत: गावातल्या गावात अल्पदरात आरोग्यसेवा उपलब्ध झाली. दुखण्यांसाठी औषधपाण्याच्या शोधात अन्यत्र जाण्याची गरज संपली. ग्रामीण आरोग्याला पर्याय म्हणून हा 'भारत वैद्य' उपक्रम यशस्वी ठरला.

यातूनच पुढे गावोगावी बचत गट निघाले. त्या गटांचा एक मोठा 'संघ' झाला. 'संजीवनी महिला बचत महासंघ' आज या संघात अडीचशे बचत गट आहेत. या बचत गटांनी ग्रामीण स्त्रीला व्यवसाय दिला. शेतीसाठी तिला जोडधंदे सुरु करता आले. आर्थिक स्थैर्य मिळाले. या बचत गटातून दबावगटही तयार झाले. स्त्रियांनी आपल्या बैठकीसाठी जागा मिळवली. दारुबंदी यशस्वी करुन दाखवली. धोबीकट्ट्यासाठी मागणी करुन तो बांधवूनही घेतला.

या बचत गटामुळे ग्रामीण स्त्रीला घरात आणि समाजात 'पत' आली. तिलाही आत्मविश्वास आला. निर्णय घेण्याची क्षमता तिच्यात आली. तिच्या जाणीवा समृध्द करण्याचं काम हॅलो मेडिकल फाऊंडेशननं सर्वतोपरी केलं. विविध पुस्तिका, पथनाट्ये, डॉक्युमेंटरीज, व्याख्याने, विविध उपक्रम याद्वारे प्रबोधन केलं. त्यांच्या साक्षरता वर्गातून आज ७०० निरक्षर स्त्रिया साक्षर झाल्या आहेत.

स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार हे विषयही फाऊंडेशनच्या कार्यात प्राधान्य ठेवून होतेच. त्यासाठी त्यांने समुपदेश केंद्र कार्यान्वित केलं. पीडित स्त्रीला प्रतिकार करण्याचं धाडस दिलं. ग्रामीण स्त्री आरोग्याचा प्रश्न हा तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराशी निगडित आहे. अत्याचाराला विरोध करताना कायदेशीर बाजू स्त्रीला माहित असावी म्हणून संस्थेनं बचत गटाच्या स्त्रियांना कायदेविषयक प्रशिक्षण देण्याचीही सोय केली आहे.

बालविवाहाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीनेही फाऊंडेशन क्रियाशील आहे. सासू–सून यांचे नाते सौहार्दाचे राहावे म्हणून खास नव्या समारंभाची प्रथा फाऊंडेशनने सुरु केली.

थोडक्यात ग्रामीण आरोग्य हे लक्ष्य समोर ठेवून हॅलो मेडिकल फाऊंडेशन गेली पंधरा वर्षे कार्यरत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील ७० गावातून ही संस्था प्राथमिक आरोग्य, बचत गट, एडस् जनजागरण, स्त्रीवरील हिंसाचा वगैरे बाबतीत दक्ष आहे. शिवाय, फिरते वाचनालय, फिरती प्रयोगशाळा हे अभिनव उपक्रम ती राबवत आहे. ग्रामीण आरोग्य सुधारणेच्या प्रयत्नात त्या त्या समस्येवर उपाय शोधत संस्थेने आपलं कार्य नेटानं चालू ठेवलंय. व्यापक केलंय. विशेष म्हणजे स्थानिक संसाधने वापरुन, लोकांच्याच सहभागातून ती आपले लक्ष्य गाठत आहे.

संस्था आपोआप उभ्या राहात नसतात ! डॉ. शशिकांत अहंकारी, डॉ. सौ. शुभांगी अहंकारी आणि त्यांचे सहकारी यांच्या अथक प्रयत्नातून 'ग्रामीण विकास' बाळसं धरत आहे. त्यांच्या प्रयत्नांची दखल 'महाराष्ट्र फाऊंडेशनने' घेतली आहे. अभिनंदन !

हॅलो मेडिकल फाऊंडेशनची ही यशोगाथा भारत गजेंद्रगडकर यांनी अक्षरबध्द केली आहे ती प्रेरणादायी ठरेल यात संशय नाही.

**– वीणा गवाणकर**



*MAHAROGI SEWA SAMITI, WARORA*
At & Post: ANANDWAN - 442914
Via: Warora, Dist.: Chandrapur,
Maharashtra State, INDIA.
Phone: +91-7176-282034, 282425
Fax: +91-7176-282134
E-mail : anandwan_ngp@sancharnet.in

21-8-05

MESSAGE TO HALO MEDICAL FOUNDATION
(For the year of Silver Jubilee of Halo and Tapapurti of HMF)

- **CONTINUOUS CREATIVE ACTIVITY IS HAPPINESS.**

- **IT IS GOOD TO GET BUT BETTER TO GIVE, IS THE COMMAND OF ALL RELIGIONS.**

- **PEOPLE TEST YOU BEFORE THEY ENTRUST YOU.**

**Baba Amte**
**Anandwan**



# लेखकाचे मनोगत....

हे माझे पांचवे पुस्तक. हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या डॉ. शशिकांत अहंकारी यांच्या स्नेहामुळे आणि कार्यापुढे मी अनेकवेळा अणदूरला जात असतो. त्यांची २५ वर्षाची संघटनेची वाटचाल मी फार जवळून पाहीली आहे व त्यावर अनेक लेखही या काळात लिहिले आहेत. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीचा लेखाजोखा यानिमित्ताने मांडण्याची संधी मिळाली. हे कार्य मी किती करु शकलो हे तुम्हीच ठरवायचे. या सर्व कामात संस्थेचे पूर्णवेळ कार्यकर्ते व भारत वैद्य कार्यकर्ते यांचे मोलाचे योगदान आहे. किंबहुना त्यांच्या सहकार्याशिवाय हे लिखाण केवळ अशक्य होते त्यांचा मी आभारी आहे. संस्थेने माझ्यावर विश्वास ठेऊन ही संधी दिली याबद्दल त्यांचेही आभार. यात यश मिळाले असेल तर तो संघटनेच्या कार्याचा गौरव समजावा व अपयश असेल तर ते माझे समजावे एवढीच विनंती.

धन्यवाद !

**– भारत गजेंद्रगडकर**

# मनोगत....

१९ ऑक्टोबर २००२

भारतवैद्य प्रशिक्षण केंद्र अणदूरच्या कॉन्फरन्स हॉल मध्ये आम्ही १५–२० जण कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी साडेसातलाच एकत्र जमलेलो. धनगरवाडी गावच्या कार्यकर्तीचा फोन आला, ''गाडी पाठवून द्या आम्हाला आता एक मुल सापडलय'' नागिणी आरळे, धनगरवाडीची भारत वैद्य कार्यकर्ती, बचतगटाच्या रुक्मिणी एडकेबाई सोबत चार तरुण कार्यकर्ते केंद्रावर आले. उबदार कपड्यात गुंडाळून आणलेल्या मुलीला माझ्यापुढे टेबलवर ठेवले. मूल रडत होते चार एक तास झाले असावेत जन्मून.

स्वयंपाक करता करता, पिठाचा हात घेऊन या महिलांनी हे मूल आणलं. गावाशेजारील शेतात शेतकऱ्याने कुळव जुंपला, सुरु केला आणि त्याला हे मातीत पुरलेलं मूल दिसलं, त्याने नागिणीला पळत जाऊन बोलवलं, नागिणीने मूल ताब्यात घेऊन स्वच्छ करुन, नाक, तोंड साफ केलं, गरमपाण्यानी स्वच्छ केलं आणि मुलीने टकाटक डोळे उघडले, रडायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांना प्रश्न पडला, या बेवारस मुलाचे काय करायचे, हे असे का घडले, बचतगटाच्या ३०–४० महिला एकत्र आल्या. नागिणीच्या मागे धाडसाने उभ्या राहिल्या, तिने पुढाकार घेतला या सर्व महिलांच्या चेहऱ्यावर एक मुलगी वाचवण्याचा आनंद होता, अशा कठीण प्रसंगी संघटीतपणे निर्णय घेण्याचा आत्मविश्वास दिसत होता. लिंगभाव असमानतेने ग्रस्त असलेल्या समाजाची चीड होती. आणि हे सर्व आता आम्ही बदलणार अशी जिद्द होती.

अनेक वर्षापासून पिचलेल्या स्त्रियांचे आकाश भारतवैद्य नागिणीच्या माध्यमातून मोकळे होत होते. ती मुलगी आज पंढरपूरच्या नवरंगे बालकाश्रमात वाढते आहे.

सामाजिक जाणीवेने समृध्द असणारा डॉक्टर तयार व्हावा व समाजात वैद्यकीय जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात या उद्देशाने १९८० साली औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयात हॅलोची चळवळ सुरु झाली, ज्या चळवळीतूनच १९९२ ला हॅलो मेडिकल फाऊंडेशनची सुरुवात झाली.

आरोग्याच्या प्रश्नाकडे समग्रपणे, सर्वांगीण पध्दतीने पाहण्याचा दृष्टिकोन सुरुवातीपासूनच होता. आरोग्याच्या क्षेत्रातील कोणत्याही एका समस्येकडे, ती समस्या वेगळी करुन पाहता येत नाही. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याची जी व्याख्या केली ती समग्र आहे. आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नसून शारीरिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक स्वास्थ्य.

गेल्या २५-३० वर्षाच्या या क्षेत्रातील अनेक प्रयोगातून अनुभवातून संस्थेच्या वाटचालीला आकार येत गेला. गावपातळीवर आरोग्याचे प्रश्न सोडवायचे असतील तर गावातील ८ वी ते १० वी पर्यंत शिकलेली, गावाने निवडलेली महिला, विशिष्ट पध्दतीच्या प्रशिक्षणातून 'भारतवैद्य कार्यकर्ती' तयार होते आणि गावाचे ८० ते ९० टक्के आरोग्याचे प्रश्न सोडवते असे अनुभवाला आले आहे.

हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या सर्व कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी 'भारतवैद्य कार्यकर्ती' आहे. तिच्या कामाची सुरुवात ही आरोग्यातून होते. ती त्या त्या गावची खऱ्या अर्थाने वैद्य बनलीय. शारिरीक वेदनाशी नाते जोडून त्यावर उपचार करता करता समाजमनाचा वेध घेण्यात वाकबगार झाली. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर, लोहारा व उमरगा तालुक्यातील ७० गावातून काम करणाऱ्या ७५ भारतवैद्य कार्यकर्त्या या आता फक्त आरोग्यासाठीच काम करीत नसून एकूण समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील महत्वाचा दुवा ठरत आहेत. या दीड लाख लोकसंख्येमध्ये सुरूवातीला आरोग्य प्रकल्प त्यातून महिलांचे व्यासपीठ म्हणून बचत गट, बचत संघ त्यानंतर किशोरी प्रशिक्षण स्त्रियावरील अत्याचाराला विरोध अशी प्रकल्पांची साखळीच निर्माण होत गेली.

भूकंपानंतर लगेच हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या कामास सुरुवात झाली साधारणपणे दीड लाख लोकसंख्येत १४ वर्षे सातत्याने कार्य चालू आहे. आज मागे वळून पाहताना कामाचा लेखाजोखा मांडताना संस्थेच्या कार्याच्या रुंदावलेल्या क्षितीजाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न आम्ही करतो. संपूर्ण प्रवासाची माहिती शब्दबध्द व्हावी व जिज्ञासू वाचकापुढे जावी अशी कल्पना पुढे आली. यातून काही समाजाभिमूख मंडळी संस्थेच्या कामासाठी पुढे आली तर त्यांचे स्वागतच आहे. आमचे मित्र श्री. भारत गजेंद्रगडकर हे ३० वर्षापासून

पत्रकारितेच्या क्षेत्रात आहेत. चिकित्सक, अभ्यासू व निर्भय पत्रकार म्हणून त्यांची ख्याती आहे. हॅलोची औरंगाबादला चळवळ सुरु झाल्यापासून ते सतत संपर्कात असतात. हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या अणदूरच्या प्रकल्पाच्या सुरुवातीपासून अनेक कार्यक्रमांना ते उपस्थित होते. अनेक गावांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यांनी अशा पध्दतीच्या पुस्तकाची कल्पना मांडली आणि हे पुस्तक तयार झाले. त्यांच्या या योगदानाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्यासाठी थोर साहित्यिका वीणा गव्हाणकर यांना आम्ही विनंती केली. दोन वर्षापूर्वीच्या महिला मेळाव्यासाठी त्या पाहुण्या म्हणून इथे आल्या होत्या. त्यांच्या एक होता कार्व्हर, डॉ. खानखोजे, भगिरथाचे वारस या पुस्तकांनी युवा पिढीसमोर आदर्श उभे केले आहेत. आमच्या कार्यक्षेत्रातील तरुण मंडळी या पुस्तकांनी प्रभावित होताना आम्हाला आमच्या कामात खुप उत्साह येतो. वीणाताईंच्या प्रस्तावनेबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो.

पुस्तकासाठी वापरलेली बरीचशी छायाचित्रे संस्थेच्या मैत्रीण विद्या कुलकर्णी यांची आहेत. पुस्तकाची सुबक छपाई संप्रति ऑफसेट प्रिंटर्स, सोलापूरच्या श्री. महेश बिराजदार यांच्या परिश्रमातून झाली आहे.

या पुस्तकावरील व उपक्रमावरील वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत आहे.

**डॉ. शशिकांत अहंकारी**
अध्यक्ष,
हॅलो मेडिकल फाऊंडेशन

# अनुक्रमणिका


अशी झाली सुरुवात — १ ते ६


'भारत वैद्य' एस.टी.च्या खर्चात उपचार गावात! — ७ ते १०

आम्ही स्वयंसिद्ध — ११ ते १८

मोकळे आकाश — १९ ते २६

आत्मभान — २७ ते ३४

घुमारे — ३५ ते ६४




सोलापूर ते हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वर, सोलापूरपासून ४० कि.मी. अंतरावर अणदूर या गावी महामार्गालगत संस्थेचे केंद्र आहे.

# अशी झाली सुरुवात



**१९८० हॅलो चळवळीची पहिली बॅच**

किस्सा बऱ्याच वर्षापूर्वीचा आहे. ''पाहुण्यांना तुम्ही कोणते गाणं ऐकवणार आहात ?'' डॉ. शशिकांत अहंकारी यांनी गोलाकार डोममध्ये समोर बसलेल्या महिलांना प्रश्न विचारला. त्या महिलांनी दोन मिनिटे आपापसात चर्चा केली व खड्या आवाजात ''बुध्द, कबीर, भिमराव फुले या भूमीवर जन्मले'' हे गीत सुरु केले. त्या अत्यंत तल्लीनतेने गात होत्या. या १०-१२ महिलांनी कधी घराबाहेर, सार्वजनिक ठिकाणी पायही ठेवला नसेल, परक्या पुरुषासमोर गाणं म्हणणं तर सोडाच, साधं बोलण्याचाही प्रसंग त्यांच्यावर कधी आला नसेल. इथे त्या मोकळेपणाने गीत गातांना पाहून माझ्यासोबतची मित्रमंडळी तर आश्चर्याने थक्क झाली होती. ही किमया केली होती डॉ. शशिकांत व त्यांची पत्नी डॉ. सौ. शुभांगी उर्फ राणीने. या महिलांचा आत्मविश्वास जागवणे, त्या एक मोठे सामाजिक कार्य करत आहेत, असा विश्वास त्यांच्या घरच्या मंडळीत

निर्माण करणं व त्या महिलांना चूल आणि मूल यातून बाहेर काढून प्रशिक्षण देतानांच आत्मनिर्भर करुन त्यांचा आत्मसन्मान वाढवणं ही वाटते इतकी सोपी गोष्ट नाही. पण हे या दांपत्यानं करुन दाखवलं होतं.

शशिकांत हा उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील अणदूर जवळच्या खुदावाडी या एका छोट्या खेड्यातला. मध्यमवर्गीय पण सुसंस्कृत अशा कुटूंबात तो जन्माला आला. १९७७ साली औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. ची पदवी त्यांनं घेतली. उस्मानाबादच्या जिल्हा रुग्णालयात इंटर्नशीपसाठी आल्यानंतर त्याचा व माझा परिचय झाला. जेष्ठ पत्रकार व दै. मराठवाडाचे संपादक कै. अनंत भालेराव यांच्या सूचनेनुसार तो माझ्याकडे ओळख करुन घेण्यासाठी आला व तेंव्हापासून आमची मैत्री झाली. ती आजतागायत तितकीच दृढ राहिलेली आहे. त्या काळातही त्याचा चळवळ्या स्वभाव त्याला स्वस्थ बसू देत नव्हता. त्यावेळी आम्ही येडशीजवळच्या मलकापूर येथे असलेल्या व झाडपाला देऊन रोग बरा करण्याचा दावा करणाऱ्या एका भोंदू बाबाच्याविरुध्द मोठे आंदोलन केले होते. उस्मानाबादच्या शशिकांतच्या वास्तव्याच्या काळात माझ्या घरी आम्ही अभ्यासवर्ग सुरु केला होता. १५–२० जणांच्या गटात विविध विषयांवर मान्यवरांना बोलावून त्यांचे विचार ऐकणं व चर्चा करणं असा हा अभिनव उपक्रम उस्मानाबादसारख्या शहरात त्यावेळी प्रथमच सुरू केलेला असल्यानं त्याला प्रतिसादही चांगलाच होता.

शशिकांत त्यानंतर पुण्याच्या के. ई. एम. हॉस्पिटलच्या अंतर्गत वढू बुद्रुक येथील ग्रामीण आरोग्य संवर्धन प्रकल्पात वैद्यकीय अधिकारी म्हणून १९७८ जानेवारी मध्ये रुजू झाला. तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री राजनारायण यांनी ग्रामीण आरोग्याच्या व्यवस्थेला पर्याय म्हणून जनस्वास्थ्यरक्षक योजनेचा प्रारंभ केला होता. त्याचा पथदर्शक प्रकल्प वढू बुद्रुक येथे सुरू झाला होता. येथील कामाचा त्याला त्याच्या पुढील वाटचालीत खूप उपयोग झाला. या प्रकल्पाला पुण्याच्या बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी भेट देत असत. एक गोष्ट शशिकांतच्या प्रकर्षाने लक्षात आली की, जर या विद्यार्थ्यांमध्ये या वयातच सामाजिक जाणीव निर्माण झाली तर ते सक्षम व समाजाभिमुख डॉक्टर्स होऊ शकतील. ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा प्राथमिक आरोग्य केंद्र हा कणा आहे. त्या ठिकाणी काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर ३०–४० हजार लोकांचे आरोग्य अवलंबून असते त्यामुळे आरोग्याच्या विषयावर पुढील कामाची दिशा ठरली.

१९८० साली शशिकांत औरंगाबादला पदव्युत्तर शिक्षणासाठी परत आला. १९७७ ते १९८० या तीन वर्षाच्या कालखंडात महाविद्यालयीन वातावरण खूपच बदलल्याची त्याला जाणीव झाली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रकरणाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जातीयवादाच्या पातळीवर गटतट निर्माण झाले होते, त्याला वैद्यकीय महाविद्यालयही अपवाद नव्हते. या पार्श्वभूमीवर शशिकांतने त्या सर्व विद्यार्थ्यांच्या संवेदनशीलतेला साद घालण्यासाठी १४० प्रश्नांची एक प्रश्नावली नोटीसबोर्डवर लावली. प्रश्न बरेच होते त्या काळात ते प्रस्तुत होते. त्यातील काही प्रश्न ''तुम्ही ज्यावेळेस आईच्या गर्भाशयामध्ये वाढत होता तेव्हा तुमच्या आईची गरोदरपणाची नोंद नर्स ताईकडे झाली होती का? तुमच्या आईने टी.टी. चा डोस घेतला होता का? तुमच्या वेळेचे आईचे बाळंतपण कोठे झाले? तुमची स्वत:ची नाळ दगडाने ठेचली गेली का कोयत्याने कापली? हे कधी आईला विचारले का? आणि तरीही तुम्ही जगलात हा योगा योग नाही का?''

तर असाच योगा योग इतरांच्या आयुष्यात येऊ द्यायचा की आपण काय करायचे हे ठरवायचे? अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांवर विद्यार्थी अस्वस्थ झाले. या अस्वस्थ वैद्यकीय विद्यार्थ्यांची संघटना म्हणजे हॅलोची चळवळ. या प्रश्नांचा शोध लोकामध्ये जाउन घ्यायचा या उद्देशाने सुट्टीच्या दिवशी गेली २७ वर्षे औरंगाबादच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी जवळपासच्या खेड्यामध्ये जातात, आरोग्य सेवा देतात, आरोग्य शिक्षण देतात. यातून त्यांचे खरे शिक्षण होते. असे २५० ते ३०० डॉक्टर चळवळीतून तयार झाले. त्यातील काही जणांनी एकत्र येऊन १९९२ साली हॅलो मेडिकल फाउंडेशन संस्था सुरु झाली.

डॉ. शुभांगी व डॉ. शशिकांत यांनी अणदूरला १९८३ मध्ये जानकी रुग्णालय सुरु केले. शशिकांतचा पिंडच समाजसेवकाचा होता, त्यात त्याला आशीर्वाद व साथ त्याची आई जानकीबाई व सर्व भावंडाची असल्यानं त्याचा या कार्यात आत्मविश्वास वाढला. वैद्यकीय व्यवसाय करतानांच त्यांनं विविध सामाजिक चळवळी सुरु केल्या. डॉ. आंबेडकर जयंती पंधरवड्यात आसपासच्या खेड्यात जनजागृती करुन विविध उपक्रम सुरु केले व व्याख्यानमालाही सुरु केल्या. या सर्व कार्यक्रमात वावरताना त्यांना ग्रामीण भागात आरोग्याची अत्यल्प सुविधा असल्याचं जाणवलं. १९९२ मध्ये स्थापन झालेल्या या फाऊंडेशनच्या व १९८० मध्ये सुरु झालेल्या हॅलो चळवळीच्या माध्यमातून गेल्या २५ वर्षापेक्षा अधिक काळात वैद्यकीय महाविद्यालयातील ३५० पेक्षा जास्त विद्यार्थी घडवण्याचे कार्य झालेलं आहे.

३० सप्टेंबर १९९३ च्या प्रलयंकारी भूकंपाच्या हादऱ्यानंतर तर उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील हजारो कुटूंबाचे जनजीवन उध्वस्त झाले. या भयंकर घटनेनंतर या दोन्ही जिल्ह्यातील लोक अद्यापही त्या धक्क्यातून बाहेर येऊ शकलेले नाहीत. या लोकांचे निवाऱ्याचे, उदरनिर्वाहाचे जसे प्रश्न आहेत त्यापेक्षा जास्त प्रश्न आरोग्याचे आहेत. या संदर्भात प्रयत्नपूर्वक कार्य करणाऱ्या व सातत्याने त्याचा पाठपुरावा करणाऱ्या ज्या बोटावर मोजता येतील अशा संस्था आहेत त्यात हॅलो ही संस्था प्रामुख्याने अद्यापही कार्यरत आहे.

डॉ. राजनारायण यांनी जनता पक्षाच्या राजवटीत १९७७ मध्ये आरोग्य रक्षकाची कल्पना सर्वप्रथम राबवली होती. गाव पातळीवरील गरीब लोकांना दैनंदिन किरकोळ रोगावर औषधोपचार उपलब्ध नसतो व जो असतो तो लांब अंतरावर असलेल्या सब सेंटर्स वा प्राथमिक आरोग्य केंद्रात असतो. या आरोग्य रक्षकांना लोकांमध्ये आरोग्याबाबत जागृती निर्माण करणं, रोगप्रतिबंधक उपाययोजना समजावून सांगणं व प्राथमिक उपचार करणं याचे प्रशिक्षण देण्यात आलं होतं. त्याचा परिणाम असा झाला की ७० ते ८० टक्के रोगावर खेड्यातच उपाययोजना झाल्यानं रोगराई कमी झाली. पण कालांतरानं ही योजनाच बारगळली. या आरोग्य रक्षकांना ५० रु. इतकं जुजबी मानधन दिलं जात असे. त्यामुळं या आरोग्य रक्षकात काम करण्याचा उत्साहच नव्हता, कालांतराने हे सर्व बंद झालं. हॅलो मेडिकल फाऊंडेशननं याच योजनेतील गावपातळीवरील आरोग्य कार्यकर्त्या हा मूळ गाभा घेऊन काम करण्याचं ठरवलं. घरातील एक जरी महिला आरोग्याबाबत जागृत केली तर ती किमान तिच्या



घराचं आरोग्य सांभाळू शकते असं सूत्र धरून या कामासाठी फक्त महिलांना प्रशिक्षण देण्याचं ठरलं. जेथे जेथे आयुर्वेदिक किंवा प्राचीन काळातील आरोग्य पध्दतीचा आधार घेता येईल तेथे तो घेऊन ॲलोपॅथीची औषधं वापरुन बहुऔषधी उपचारपध्दती अवलंबण्याचं ठरलं.

डिसेंबर १९९३ मध्ये हॅलो मेडिकल फाऊंडेशनचे कांही कार्यकर्ते व मेडिको फ्रेंडस् सर्कलचे कार्यकर्ते यांची एक संयुक्त बैठक अणदूरमध्ये झाली होती. डॉ. श्याम अष्टेकर यांनी ''भारत वैद्य'' नावाचं एक पुस्तक लिहून एक संकल्पना मांडली होती. ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी आणि पारंपारिक घरगुती उपचार यांची सांगड घालून एक सोपा अभ्यासक्रम त्यांनी तयार केला. त्याचे एकूण वर्षभरात फक्त ५० दिवसांचं प्रशिक्षण दिलं तर त्या गांवची प्राथमिक उपचाराची गरज ती महिला भागवू शकते. असं या प्रशिक्षणाचं स्वरुप आहे. त्याचा वापर करुन या भूकंपग्रस्त भागात, त्यातही उस्मानाबाद जिल्ह्यात असे 'भारत वैद्य' तयार करुन या लोकांना आरोग्य सेवा व आरोग्य शिक्षण देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. ऑक्सफाम इंडिया ट्रस्ट या दिल्लीच्या स्वयंसेवी संस्थेनं फाऊंडेशनच्या या योजनेला मान्यता देऊन महिलांसाठी आरोग्य प्रशिक्षण शिबिरं आयोजित करुन अर्थसहाय्य करण्याची संमती दिली आणि संस्थेनं १९९३च्या भूकंपापासून काम सुरु केलं.

भूकंपग्रस्त भागातील १६ गावच्या प्रत्येकी एक या प्रमाणे १६ महिला व खुद्द अणदूर भागातील १० अशा एकूण २६ महिलांना २१ दिवसाचं भारत वैद्य अभ्यासक्रमाचं प्रशिक्षण दिलं. नंतर त्या महिला त्यांच्या गावात काम करु लागल्या. जिल्हा रुग्णालयात आणि वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णांना कसं तपासलं जातं, कसे उपचार केले जातात हे दाखवण्यासाठी या प्रशिक्षणार्थी महिलांना सोलापूरच्या डॉ. वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयात व उस्मानाबादच्या जिल्हा रुग्णालयात नेण्यात आलं. तेथे त्यांची व तत्कालीन अधिष्ठाता डॉ. चांदोरकरांची चर्चा झाली. कांही इंटर्नशीप करणाऱ्या विद्यार्थ्यांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेचा इतका चांगला परिणाम झाला की विद्यार्थ्यांनी स्वत:हून भूकंपग्रस्त भागात काम करण्याची तयारी दर्शविली. औरंगाबादचे हॅलोचे कार्यकर्तेही आधीपासूनच तयार होते. त्यातून एक आरोग्ययात्रा काढण्यात आली. औरंगाबादचे १८ व सोलापूरचे १२ इंटर्नशीप करणारे डॉक्टर विद्यार्थी होते. त्यांना आवश्यक असेल तेंव्हां मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. जगन्नाथ दिक्षित व डॉ. विजय गायकवाड हे त्यांचे प्राध्यापक होते. तसेच अणदूरच्या सावधान कलापथकाचे ६ तरुण कार्यकर्ते, शिवाय डॉ. पुरुषोत्तम पुरी, डॉ. क्रांती रायमाने,

स्वत: डॉ. शशिकांत व डॉ. सौ. राणी हे मार्गदर्शक असा संच जमला. या सगळ्याना आशीर्वाद देऊन मार्गदर्शन करणारे, कौतुक करणारे प्रसिध्द स्वातंत्र्यसैनिक  श्री. नारायणराव लोहारेकर हे खंबीरपणे पाठीशी होतेच. या सर्वांच्या मुक्कामासाठी लोहारा हे मुख्यालय ठरले. दि. ४ ते १४ जून १९९४ या काळात एकूण १९ गावात ही आरोग्ययात्रा गेली. कलापथकाच्या सहाय्याने गाणी, पथनाट्ये यांचा वापर करुन लोकांना यात्रेच्या आगमनाची वर्दी दिली जाई. शाळा किंवा एखाद्या मोठ्या हॉलमध्ये विविध आरोग्यविषयक पोस्टर्स, वैद्यकीय महाविद्यालयातील विविध शरीराच्या अवयवांचे नमुने यांचे प्रदर्शन भरवून कार्यकर्ते त्याची माहिती गांवकऱ्याना, विद्यार्थ्यांना देत. लोकांना आरोग्यविषयक शिक्षण देत, आरोग्यासंबंधी पत्रके  वाटली जात, स्लाईड शो, व्हिडीओ कॅसेटद्वारे विविध रोग व त्यावरील उपचार यांची कल्पना देत. गांवातल्या रुग्णांची तपासणी करुन आवश्यक तो उपचारही करत. लोकांच्या प्रश्नांना उत्तरं देऊन शंका समाधान केलं जाई. या कलापथकाच्या तरुणांनी कांही पथनाट्यं बसवलेली होती व त्याचे प्रयोग करुन खास गावरान भाषेत ते आरोग्यविषयक लोकजागृती व प्रशिक्षण देत असल्यानं लोकही त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत असत. डॉ. अंजली दीक्षित व डॉ. जगन्नाथ दीक्षित यांच्या ''आरोग्याची बडबडगीते'' पुस्तकाच्या शेकडो प्रतीही या यात्रेत वाटल्या होत्या. लोहाऱ्याहून प्रारंभ झालेल्या या यात्रेचा जेवळी येथे समारोप झाला. जवळपास १५-१६ हजार लोकांनी या सर्व उपक्रमाचा लाभ घेतला. ऑक्सफाम इंडियाच्या लातूर शाखेनं या आरोग्य यात्रेस मदत केली.

या इंटर्नस व कार्यकर्त्यांना जेव्हा या आरोग्ययात्रेच्या अनुभवाविषयी मनोगत लिहिण्यास सांगण्यात आलं तेंव्हा त्यांनी या यात्रेमुळं आपल्याला समाजात वावरण्याची, त्यांचे प्रश्न व सुख दु:खं समजून घेण्याची संधी मिळाल्याचं आवर्जून नमूद केलं. विशेष म्हणजे ज्या गावच्या महिलांना भारत वैद्यचे प्रशिक्षण दिलेलं होतं त्याच गावाचा या यात्रेत सहभाग असल्यानं त्यानंतर आरोग्याच्या प्राथमिक गरजांचा पाठपुरावा करण्यासाठी त्या गांवात संस्थेची कार्यकर्ती उपलब्ध होणार होती. उघड्यावरची गटारं व त्यातील दूषित पाणी, उघड्यावरची शौचालयं व त्यामुळं होणारे सांसर्गिक रोग, त्यांची लक्षणं, उपचार व ते होऊ नयेत म्हणून करावयाची प्रतिबंधक उपाययोजना यांचीही सविस्तर माहिती या यात्रेत दिली होती. त्यामुळं लोकांना त्याचं किमान ज्ञान झालं व लोक त्याबाबत सजग होऊन काळजी घेऊ लागले.

*****

# 'भारत वैद्य' एस.टी.च्या खर्चात उपचार गावात!




प्राथमिक आरोग्य रक्षणाची वेगळी प्रणाली अवलंबण्याच्या दृष्टीनं संस्थेनं विचार सुरु केला. गांवातील आरोग्याचे प्रश्न हे त्याच गावानं सोडवण्यासाठी गावातील किमान एक व्यक्ती तरी प्रशिक्षित केली पाहिजे यासाठी त्या त्या गावातील थोडीफार म्हणजे ८ वी ते १२ वी दरम्यान शिकलेली महिला निवडायची. ही महिला शक्यतो लग्न झालेली, विधवा अथवा परित्यक्ता असावी म्हणजे तिच्या पुनर्वसनास मदत होईल. तिला मूल असेल तर प्राधान्य देण्याचं ठरलं. या महिलेची निवड त्या गावच्या लोकांनीच करायची. कार्यकर्त्यांची निवड गावानं केल्यामुळं तिच्याकडून गावात काम करुन घेण्याची जबाबदारी गावाचीच होती. त्याचबरोबर या प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच आपलेपणाची भावना त्यांच्यात रुजायला मदत झाली. अशा निवडलेल्या

महिलेला त्या फाऊंडेशनच्या कार्यालयात निवासी पध्दतीनं एकूण ५० दिवसांचं आरोग्य सेवेचं सविस्तर प्रशिक्षण दिलं जातं. यासाठी एक अभ्यासक्रमही तयार केला असून तज्ञ डॉक्टर मार्गदर्शक म्हणून बोलावले जातात. यापैकी २१ दिवसांच्या पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणात प्रारंभी तिला ५० प्रश्नांचा एक संच देऊन तो सोडवून घेतला जातो. त्याचं कारण त्या बाईच्या मनात आरोग्याबाबत स्वत:च्या कोणत्या संकल्पना आहेत ते कळतं. गूळ खाल्ला तर जंत होतात, पपई खाल्ली तर गर्भपात होतो, बाळाच्या अंगाला तेल लावले तर वजन वाढते अशा पारंपारिक समजुतीला वैज्ञानिक दृष्टीकोन कोणता हे त्यांना माहित नसते. ते या शिबिरात समजावून सांगितलं जातं. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते मॉडेल्स्, खेड्यात प्रथमोपचार करण्यासाठी लागणारं साहित्य यांचा एक संच संस्थेने तयार केला आहे. कार्यकर्तीला प्रशिक्षण संपल्यानंतर वरील सर्व साहित्य दिलं जातं. प्रशिक्षण काळात फिल्म्स्, गाणी, गोष्टी यांचा वापर केल्यानं सहजतेनं विषय समजतो. प्रशिक्षणासाठी डॉ. श्याम अष्टेकरांचे ''भारत वैद्यक'' हे संदर्भ पुस्तक वापरले जाते. प्रशिक्षण पूर्ण झालेल्या आरोग्य कार्यकर्तीला हे पुस्तक संस्थेतर्फे भेट दिलं जातं. पहिल्या एकवीस दिवसांच्या सलग प्रशिक्षणानंतर त्या महिलेला तीन महिन्यानंतर एक आठवडा असा एकूण पन्नास दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. या महिलांना संस्थेतर्फे आधी एक–दोन वर्षे महिना तीनशे रुपये मानधन दिलं गेलं. त्या काळात व त्यानंतर ही महिलांना जी औषधोपचार पध्दती शिकवण्यात आली त्यातील औषधं गावातील गरजू रुग्णांना देण्यासाठी किमान दर आकारुन विकत दिली जातात. त्यामुळं त्या गावात अर्धवट ज्ञान असलेले जे लोक वैद्यकीय व्यवसाय करत असतात त्यांना प्रतिबंध झाला. लोकांनाही किरकोळ आजारावर माफक दरात उपचार उपलब्ध असल्यानं तेवढ्यासाठी १०–२० कि.मी. अंतरावरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत जाण्याची पाळी येत नाही. यासाठी बडोद्याची एक औषध कंपनी (LOCOST) जी फक्त अशा स्वयंसेवी संस्थानाच अत्यल्प दरात औषधं पुरवते, त्यांच्याकडून औषधं संस्थेनं आणून ठेवली असून ती या प्रशिक्षित महिलांना पुरविली जातात. अत्यल्प खर्चात लोकांना आरोग्यसेवा मिळायला लागली आणि संस्थेची घोषणा पुढे आली. ''एस.टी.च्या खर्चात उपचार गांवात'' प्राथमिक आरोग्य केंद्राकडं औषधोपचारासाठी जाण्यासाठी लागणाऱ्या एस.टी.च्या खर्चात गावात भारत वैद्य कार्यकर्त्या उपचार करु लागल्या. ज्याचा खर्च सरासरी ५ रु. असतो.

संस्थेने या दैनंदिन कामाच्या व्यवस्थापनासाठी ७ पुरुष पूर्णवेळ कार्यकर्ते नेमलेले आहेत. हे कार्यकर्ते कलावंतही आहेत. ते आपले काम

सांभाळून इतरवेळी कलापथकाचे कार्यक्रम करुन जनजागृती करतात. प्रत्येक कार्यकर्त्यानं किमान १० गांवं एका आड एक या पध्दतीनं भेट देऊन तेथील कामाचा अहवाल संस्थेला द्यावयाचा असतो. त्यांच्याच सोबत समाजशास्त्र व नर्सिंगचा अभ्यासक्रम केलेल्या १४ महिला कार्यकर्त्या याच पध्दतीनं गावाना भेटी देतात. सध्या प्राथमिक स्तरावर ही योजना तुळजापूर तालुक्यातील अणदूर व लोहारा या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ७० गावाात राबवली जात असून ७२ महिला भारतवैद्य म्हणून काम करत आहेत. त्यांनी आपलं घरचं काम करुन आपापल्या गावात घरोघरी भेटी देऊन तेथील रुग्णांची चौकशी करणं, त्या घरात आवश्यक असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती देणं, मार्गदर्शन व उपचार करणं. जे उपचार त्या करु शकत नाहीत त्या संदर्भात तालुका, जिल्हा पातळीवर कोठे जायचं याचं मार्गदर्शन करणं ही कामे त्या करतात. त्यांना हे काम करण्यासाठी संस्थेचे पूर्णवेळ कार्यकर्ते मदत करतात. दर १५ दिवसाला एक याप्रमाणं जवळपासच्या तीन गावांचे एक आरोग्य शिबीर घेतलं जातं. अशा शिबिरात बालरोग तज्ञ, स्त्री रोग तज्ञ अशी मंडळी चिकित्सा व उपचार करतात.

शहरातील तज्ञ व व्यावसायिक डॉक्टर्स या शिबिरात सहभागी असतात. या शिबिरासाठी जेवणखर्च व आवश्यक तो मंडपखर्च गांवकऱ्यानी करावयाचा असून तपासणी व उपचाराचा संपूर्ण खर्च फाऊंडेशन करते. या आरोग्य कार्यकर्तीला, त्या गांवचा संपूर्ण सर्व्हे करणं, जन्म–मृत्यूचे रेकॉर्ड ठेवणं, बालकांचं १०० टक्के लसिकरण होईल हे पाहणं, रोज घरांना भेटी देणं, ज्या रुग्णावर उपचार केले त्याची नोंद करणं व जे रुग्ण शहरात अधिक उपचाराला पाठवणं आवश्यक आहे त्याची नोंद करुन पाठवणं ही दैनंदिन कामे करावी लागतात. संस्थेच्या रेकॉर्डप्रमाणं या माध्यमातून सर्व ७२ भारत वैद्य आरोग्य कार्यकर्तीनी आजवर दीड लाखाहून अधिक रुग्णांची तपासणी केली आहे. औषधोपचारानंतर आतापर्यंत ७ ते ७.५० लाख रु. सेवाशुल्क मिळाले. १५ हजारापेक्षा अधिक गर्भवतींची नोंद घेऊन त्यांना प्रसुतीपूर्व मार्गदर्शन केलं. ज्यांची प्रसूती कठीण आहे अशा सुमारे ४५०० गर्भवती महिलांना पूर्वकल्पना देऊन योग्य दवाखान्यात तपासणी करुन उपचार घेण्यास सांगितलं. ६००० गंभीर आजार असलेल्या रुग्णांना संदर्भसेवा पुरविली.

संस्थेनं जेंव्हा हे प्रशिक्षण १९९४ मध्ये सुरु केलं तेव्हा २६ महिला होत्या. आतापर्यंत कार्यक्षेत्रातील ७२ महिला प्रशिक्षित झाल्या असून त्यांना

२५–३० प्रकारची ॲलोपॅथी, आयुर्वेदिक औषधं कधी द्यायची, त्याचा उपयोग काय हे पूर्णपणे माहित आहे. या संदर्भातील प्रश्नांना महिला ठामपणे उत्तरे देतात. यापैकी अनेक महिलांना घरच्यांनी प्रखर विरोध केला. पण जेंव्हा घरचे लोक प्रत्यक्ष इथं आले, त्यांनी कामाचं स्वरुप पाहिलं तेंव्हा या विरोधाचं रुपांतर सहकार्यात झालं. घराचा उंबरठाही न ओलांडलेल्या, परक्या पुरुषासमोर न आलेल्या यापैकी कांहीजणी आता मात्र त्यांच्या गावात पूर्ण आत्मविश्वासानं ताठ मानेनं वावरतात. एवढेच नव्हे तर गांवातल्या अनेक कुटुंबांना त्या घराच्या मार्गदर्शक वाटतात. कै. राजनारायण यांनी सुरु केलेली आरोग्य रक्षक योजना अयशस्वी झाली पण त्याचवेळेस जामखेडला डॉ. रजनीकांत आरोळे पती–पत्नीनी सुरु केलेला ग्रामीण आरोग्य संवर्धन प्रकल्प, अणदूरचा हा भारत वैद्य प्रकल्प, साथी पुणे येथील आदिवासी भागातील प्रकल्प, वचनसंस्था नाशिक अशा महाराष्ट्र व इतर राज्यातील स्वयंसेवी संस्थांचे ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांचे अनेक प्रयोग यशस्वी झालेले दिसतात. ग्रामीण आरोग्याला पर्याय म्हणूनच भारत वैद्य उपक्रम पुढं आला. याची उपयुक्तता नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष कै. मधू दंडवते यांना प्रत्यक्ष पाहणीनंतर मनोमन पटली. डॉ. शशिकांत अहंकारी, डॉ. शाम अष्टेकर, डॉ. क्रांती रायमाने यांना नियोजन मंडळापुढं भारत वैद्य उपक्रमाची मांडणी करण्यासाठी दिल्लीला बोलावलं होतं. ग्रामीण आरोग्याच्या समस्यासाठी गावपातळीवर काम करणारे आरोग्य कार्यकर्ते हाच प्रभावी पर्याय आहे, याची मांडणी महाराष्ट्र मेडिको फ्रेंड सर्कलचा प्राथमिक आरोग्य सेवा गट केंद्र सरकार व राज्य सरकारकडे दहा बारा वर्षे करत होता. या गटात वरील तिघांशिवाय डॉ. अनंत फडके, डॉ. ध्रुव मंकड, डॉ. दिप्ती चिरमुले, डॉ. अभय शुक्ला, डॉ. मीरा सद्‌गोपाल, डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचा समावेश होता.

२००६ साली पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची घोषणा केली. त्या योजनेची रचना भारत वैद्य प्रकल्पासारखीच आहे. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठानं आता ‘आरोग्य–मित्र’ प्रमाणपत्र कोर्स सुरु केला आहे. यामुळे भारतवैद्य उपक्रमाची शक्ती वाढली आहे. डॉ. शशिकांत यांची नियोजन मंडळाच्या आरोग्य अभ्यास गटावर व विविध शासकीय राज्यस्तरीय आरोग्य समित्यांवर निवड झाली आहे. त्यामुळे या प्रश्नांना वेगळे व्यासपीठ मिळाले.

*****

# आम्ही स्वयंसिध्दा



आरोग्याच्या माध्यमातून काम करतांना संस्थेच्या लक्षात आले की, समतोल आहाराचे महत्त्व बायकांना समजावून देतांना रोजगारी स्त्रिया म्हणत हे सगळं चांगलं चुंगलं खायला गरीबाला कसं जमावं, आणि अगदी पाटलांच्या श्रीमंत घरातल्या बाईचे हिमोग्लोबीन सुध्दा आठ किंवा नऊ ग्रॅम असे नि म्हणूनच आरोग्याच्या चळवळीसाठी एक व्यासपीठ उभं रहावं, बायकांची पत वाढावी, त्यांचे ज्ञान वाढावं यासाठी बचत गट गावोगाव सुरु करण्याचे संस्थेने ठरवले. गावातील १० ते १५ जणींचा एक गट असे गावात हळूहळू गट वाढत गेले. त्यासाठी २५ रु. प्रवेश फी व दरमहा २५ रु. बचत असते.

एका घरातील एकच महिला या गटात सदस्य होऊ शकते. व त्या गटातूनच एक सदस्य महिला सचिव म्हणून काम पहाते. अशा पध्दतीने सहा

महिने पैसे गोळा झाल्यावर अंतर्गत कर्जवाटपास सुरुवात होते. बचत गटामुळे महिलांना आर्थिक कर्ज पुरवठा सहज सुरु झाला. भारत वैद्य कार्यकर्तीला तर बचतगटाचा मोठा आधार असतो कारण त्यांचे सर्वच कार्यक्रम उदा. बैलपोळा, नववधूचे स्वागत, महिला दिन, स्वातंत्र्यदिन, संक्रांतीचे हळदीकुंकू आदी कार्यक्रम या माध्यमातूनच राबवले जातात. भारत वैद्य कार्यकर्तीने बचतगटाच्या व्यासपीठावर आरोग्य शिक्षण द्यावे व बचतगटाच्या सदस्यांनी गांवच्या महिलांना ते आरोग्य शिक्षण द्यावे अशी ही व्यवस्था आहे. भारत वैद्य कार्यकर्त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी बचत गटाचा फायदा झाला. बचतगटाच्या महिलांशी निगडीत अनेक प्रश्न सोडवले जात असल्यानं गावपातळीवरील सार्वजनिक उपक्रमासाठी ते आता व्यासपीठ बनलं आहे. अशा २५ बचत गटांना १९९६ साली एकत्र करुन संजीवनी महिला बचत महासंघ स्थापन करण्यात आला. स्वयंसहाय्य बचतगटांना कमीतकमी व्याजात कर्ज व इतर सेवा उपलब्ध करणं, संघाच्या स्वयंपूर्ततेसाठी संघाला निधी उपलब्ध करणे, गांवाला सक्षम करतील असे व्यवसाय सुरु करणे हे त्याचे प्रमुख उद्देश आहेत. या संजीवनी महिला बचत महासंघात आता सहा बचत संघांचा समावेश असून २७२ बचत गटाच्या २ हजार ६९९ महिला सभासद आहेत. या सर्वांची सध्या १४ लाख ५७ हजार २६८ रु. बचत असून त्यांनी ९७ उद्योगासाठी २ लाख ५३ हजार रुपये कर्जवाटप केले आहे. संस्थेचे १६ लाख ७५ हजार ५५१ रु. कर्जाची येणे रक्कम आहे. कर्जवाटप केलेल्या व्यवसायात किराणा दुकान (२१), कापड दुकान (१०), शिलाई मशीन (१२), मिरची कांडप (१४), दुग्ध व्यवसाय (४९), बांगडी व्यवसाय (४४), स्पीकर मंडप (३), पिठाची गिरणी (७) व शेळीपालन (४८) अशांचा समावेश आहे.





संस्थेत महिलांचा सहभाग फक्त बचत गट व त्यातील पैशाच्या व्यवहारापुरता मर्यादित होता. पण नंतरच्या काळात त्यांचे इतर विषयांच्या अनुषंगानेही प्रबोधन झाल्याने त्यांचा वेगवेगळ्या उपक्रमातही सहभाग सुरु झाला. इतर बचत गटांचे कार्य पाहण्याच्या निमित्ताने त्यांच्या परगांवी सहलीही आयोजित करण्यात आल्या. घरातील महिला केवळ बचत करायला लागली एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी घरच्या अडचणी सोडवण्यासाठी कठीण प्रसंगात, दुसरीकडून कोणतीही आर्थिक मदत मिळण्याची शक्यता नसलेल्या प्रसंगात, कर्ज काढून गरज भागवायला लागल्यावर साहजिकच घरातील तिचे स्थान, प्रतिष्ठा वाढली. ती बचत गटाच्या माध्यमातून जे उत्पन्न मिळवत होती त्याचा कांही भाग का होईना तिच्या मनाप्रमाणे खर्च करण्याचा तिला अधिकार आहे हे घरचेही गृहित धरु लागले.

बचतगटाने आपले काम करतानाच अनेक ठिकाणी दबावगट म्हणूनही काम केले. देवसिंगा येथील महिलांना बैठकीसाठी जागा नव्हती. त्यांनी त्यामुळे ग्रामसभेत ठरावही केला. १५ ऑगस्टच्या निमित्तानं गटविकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आले असता या महिलांना कार्यक्रमासाठी बोलावण्यात आले, तेव्हा त्यांनी आधी बैठकीला खोली द्या तरच येऊ असं सुनावलं. शिवाय महिलांना छोट्या छोट्या उद्योगासाठी प्रशिक्षण देण्याचीही मागणी केली. अधिकाऱ्यांनीही या मागण्या तात्काळ मान्य केल्यानंतरच या महिला कार्यक्रमाला गेल्या. गुळहळ्ळी येथे बचतगटाच्या

महिलांनी ग्रामपंचायतीनं जो धोबीकट्टा करण्याचं ठरवलं होतं त्याऐवजी पाण्यासाठी पाईपलाईन टाकण्याची मागणी केली. ग्रामपंचायतीनं ही मागणी मान्य करुन त्यासाठी चर खोदण्याचे काम श्रमदानानं केलं, तर पाईपलाईनसाठी लागणारे पाच हजार रु. संस्थेनं दिले व अशा रितीनं या महिलांनी गांवात पाणी आणण्यात यश मिळविलं. केरुरच्या महिलांनी एक पाणपोई सुरु केली. तेथे पाणी भरण्याचे काम  रोज महिला करतात. येथील एका कुंभाराचे घर जळाले होते. बचत गटाच्या महिलांनी संसारोपयोगी साहित्य गोळा करुन त्याला दिलं व त्याचं घर उभे राहीलं. दहिटण्याला एका गरीबाचे घर जळाले होते तेथे बचतगटाच्या महिलांनी त्या कुटुंबाला धान्य, कपडे गोळा करुन दिले. गांवकऱ्यांना व ग्रामपंचायतीला त्यांनी विनंती करुन त्यांनाही सहाय्य करायला लावले. संस्थेनं त्याच्या घरावर टाकण्यासाठी पत्रे दिले. दहिटण्याला बचतगटाच्या महिलांनी प्रयत्न करुन रोजगार हमी योजनेचे काम मिळवून दिले. वागदरी गावात दारुबंदी करा म्हणून महिलांनी आग्रह धरल्यानं चार वेळा ग्रामसभा होऊनही दारुबंदीचा ठराव मात्र संमत होऊ शकला नाही कारण सदस्यापैकीच कांहीजण दारुची विक्री करणारे होते. शेवटी महिलांनीच तुम्ही दारुबंदी केली नाही तर आम्ही दारुबंदी करुन दाखवू अशी तंबी दिली. त्यासाठी मोठा संघर्ष केला व दारुबंदी करुन दाखवली. महिलांच्या या शक्तीचा अंदाज आल्यानं महिलांची धोबीकट्ट्याची मागणी ग्रामपंचायतीनं तात्काळ मान्य करुन धोबीकट्टा बांधून दिला. महिला जर विधायक कामासाठी एकत्र आल्या तर काय घडू शकते. याचे उत्तम उदाहरणच या महिलांनी समोर ठेवले आहे.





बचत गटांच्या महिला म्हणजे स्वत:चे उत्पन्नाचे कसलेही साधन नसलेल्या, मोलमजुरी व फक्त घरकाम करणाऱ्या होत्या. पण बचतगटातून बायकांच्या विश्वात 'अर्थ' आला. घरातील, समाजातील पत वाढली. आवाज बुलंद झाला. व्यक्तिमत्त्वात चैतन्य आलं कारण आता वाढलेली उलाढाल नि आवक जावक त्यांना नवा आत्मविश्वास देत होती. बचतगटाच्या माध्यमातून त्यांच्या हाती व्याजाचे उत्पन्न आले व त्यांना खर्चाचा थोडाफार कां होईना अधिकार मिळाला. महिलांना बचतीची सवय लागली. पूर्वी सहलीला जायला घरची मंडळी खर्चासाठी पैसे नसल्याचं कारण सांगून परवानगी नाकारत. पण आता या महिला बचतगटाच्या उत्पन्नातून स्वत:च्या खर्चाची तरतूद करायला लागल्या. भारत वैद्य कार्यकर्ती तिला मिळणारे मानधन, व्याजाची रक्कम, स्वत:च्या नांवाने बँकेत ठेव म्हणून ठेवते. या रकमेचा वापर व्यवसायात करणाऱ्या महिलांची संख्या किमान ४० टक्के आहे हे विशेष. चिकुंद्रा गांवातील ललिता मोटे या महिलेनं बचतगटातून कर्ज घेऊन एक शेळी घेतली. ती वाढवून मोठी केली व नंतर विकली. असा खरेदी विक्रीचा व्यवसाय वाढवला. होर्टीच्या रेखा स्वामीने शिलाई मशिनसाठी १५०० रु. कर्ज घेतलं व त्यातून काम करत कापड व्यवसाय सुरु केला व हे कर्ज फेडलं. कापड व्यवसायासाठी पुन्हा पाच हजार रु. कर्ज घेतलं. आता ती पुण्याहून मोठ्या प्रमाणात कापड खरेदी करुन आणते. आता तिचं व्यवसायातील भांडवलही २५ हजार रु. पेक्षा जास्त झालं आहे. किलजच्या मैनाबाई शिंदे हिने मिरची कांडप मशिनसाठी दहा हजार रु. कर्ज घेतलं त्याची परतफेड करुन उर्वरीत उत्पन्नातून एक कापड दुकान सुरु

केलं.  ती लाल मिरचीची खरेदी–विक्रीही करते व त्यातूनही उत्पन्न मिळवते. अशीच कथा होर्टीच्या धोंडाबाई शेखबंडे, शीला वर्दे या महिलांची आहे. केशेगांवच्या १० महिलांनी संक्रांतीच्या वेळी सुगडी आणून विकली त्यात चार पैसे मिळाल्यावर उन्हाळ्यात मोठे माठ आणून विकले, त्यातही खूप फायदा मिळवला.

बचतगटाच्या महिलांना शिवण व्यवसाय, पापड तयार करणं, विविध छोट्या कलावस्तू तयार करणं, आळंबी तयार करणं याचं प्रशिक्षण देण्यात आलं. त्याचप्रमाणं पुण्याच्या 'बायफ' या संस्थेच्या सहकार्यानं महिला व पुरुषांसाठी कृषी प्रशिक्षणही देण्यात आलं. त्यात त्यांना सुधारित व नैसर्गिक पध्दतीनं शेती कशी करावी हे शिकवण्यात आलं. तुळजापूरच्या टाटा समाजविज्ञान संस्था ग्रामीण परिसर येथे २५ महिलांचं रोपवाटिका कशी करावी याबाबत एक प्रशिक्षण शिबिर झालं. त्याचा फायदा घेऊन त्यापैकी कांही महिलांनी रोपवाटिका तयार केले. त्यापैकी दहिटण्याच्या रोपवाटिकेत १० हजार रोपं, शहापूरला ५ हजार रोपं व केरुरला १० हजार रोपं तयार करुन त्यांची विक्री करण्यात आली. विविध प्रशिक्षणातून बचत गटाचा आवाका व समज वाढू लागली. स्त्रियांचे बचत गटातून संघटन, सहली, प्रशिक्षणं पाहून किशोरींनी आपले गट तयार केले व प्रशिक्षणाची मागणी केलं. शाळेतील मुलींचे व शाळा सोडलेल्या मुलींचेही गट तयार झालं, त्यांना शिवण क्लास, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणं, मेहंदी, केशरचना, रांगोळी इ. विविध प्रशिक्षण वर्ग सुरु झालं.



## भरारी :

१३ ते १८ वयोगटाच्या शाळेतील मुलामुलींसाठी एक अभिनव निबंध स्पर्धा घेतली. त्यात मुलांना ''मी मुलगी असते तर'' आणि मुलींना ''मी मुलगा असते तर'' असे विषय दिलेले होते. या विषयांचा हेतू असा होता की, मुलांना देखील मुलींवर कामाचा किती बोजा असतो हे कळावं. आश्चर्य असं की खुदावाडी, फुलवाडी, चिकुंद्रा या खेड्यात झालेल्या स्पर्धेत जवळपास ६०-७० मुलेमुली सहभागी होती व त्यांनी खूप सुंदर पध्दतिनं हा विषय मांडला होता. त्यानंतरही विविध शाळेत वेगवेगळ्या निमित्तानं अशा स्वरुपाच्या वेगळ्या धर्तीच्या स्पर्धा घेतल्या गेल्या. मुलींना युनिसेफची ''मीना'' ही कार्टून फिल्म दाखवण्यात आली. किशोरी गटांच्या मुलींची जी प्रशिक्षण शिबिरं झाली त्यात आतापर्यंत ७०० मुलींचा सहभाग होता. बालविवाहाचा प्रश्न व परिणाम समजावून सांगितल्यावर रवा हिप्परगा, कास्तीखुर्द इथल्या ५० मुलींनी बालविवाह करणार नाही अशी प्रतिज्ञा केली.

अनेक ठिकाणी मुली दूर अंतरावरच्या गावात शाळेसाठी जात असत. शिवाय मुलींना साधी सायकलही चालवायला येत नव्हती. संस्थेनं गांवातील मुलींना तीन सायकली घेऊन सायकल चालवायला शिकवली. प्रत्येक गांवात या तीन सायकली तीन महिने ठेवल्या जात. त्यासाठी अवघ्या एक रुपया तास हे शुल्क आकारलं जाई. ही सर्व व्यवस्था त्याच गावातील एखाद्या चुणचुणीत मुलीवर सोपवली जाई. या येणाऱ्या रकमेतून सायकलीच्या देखभालीचा खर्च केला जाई. त्या गावातल्या मुलींनी आमचं शिकणं संपलं असं सांगितलं की त्याच सायकली दुसऱ्या गावात पाठवून हाच प्रयोग तेथे सुरु होई. अशा पध्दतिनं आजवर आसपासच्या १६ गावातील २५० मुली आता सायकल चालवायला शिकल्या आहेत. खुदावाडी, नागूर, कास्ती, गावच्या जवळपास ५० मुली आता स्वत:च्या सायकलवर शाळेत व कामाला जातात.

बचत गटाच्या ज्या महिला आहेत त्यांच्या घरातील तरी सर्व मुलं शाळेत जातात का? असा आढावा दर सहा महिन्यानी घेतला गेला. तेव्हा अशा कार्यकर्तीच्या ६ ते १८ वयोगटातील शाळेत जाण्या योग्य किती मुली शाळेत जातात व किती जातच नाहीत? याचंही सर्वेक्षण करण्यात आलं. दहिटणा गावच्या वस्तीवरच्या मुलींना आठवीपासून शिक्षणाला शहापूरला यावं लागतं. कारण त्यांच्या गावात फक्त ७ वी पर्यंतच शाळा आहे. अनेक मुलींनी याच कारणानं सातवीनंतर शाळाच सोडून दिली होती. यात शेतात कामावर जाणाऱ्या महिलांच्या मुलींची संख्या जास्त होती. शिक्षण घेऊन तरी काय फरक पडणार

आहे ? त्याच्याऐवजी इथेच काम केले तर रोजगार तरी घरी येईल ही त्यामागची भावना होती. शिबिरात या मुलींना आपण शिकलेच पाहिजे ही जाणीव निर्माण झाल्यानं एक वर्षाचा गॅप घेतलेला त्या मुलींनी त्या वर्षानंतर शहापूरला शाळेत पुन्हा प्रवेश घेतला व त्या शिक्षणासाठी जाऊ लागल्या. असाच प्रकार बेलवाडीचा होता. बेलवाडी ते सलगरादिवटी हा अवघ्या ६ कि.मी. चा रस्ता खूप खराब होता व जाण्या येण्याची कसलीही दुसरी सोय नव्हती. त्यामुळं ८ वी नंतरची शाळाच बंद करुन जवळपास २५ मुली घरी बसल्या होत्या. गावच्या महिलांनी सातत्यानं मागणी करुन रस्ता दुरुस्त करवून घेतला आणि गावाला एस. टी. बस सुरु झाली. पण आता त्या मुलींची पुढं शिकण्याची मानसिकताच नव्हती. मग तेथील भारत वैद्य कार्यकर्तीने त्या मुलींचे समुपदेशन करुन त्यांना शिक्षणाचं महत्त्व पटवले. परिणामी सर्व मुली आता पुढचं शिक्षण घेण्यासाठी शाळेत जायला लागल्या आहेत.

महिलांचे मेळावे होताना पाहून किशोरीनाही आपलाही मेळावा व्हायला हवा असे वाटू लागले. केशेगांव, केरुर, शहापूर, खुदावाडी, मुर्टा येथे आसपासच्या १० गावांतील किशोरींचे मेळावे आयोजित करण्यात आले. त्यात रांगोळी, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धा झाल्या. किशोरींच्या विविध कलागुणांना वाव देण्याचा व्यासपीठ म्हणून त्याचा उपयोग झाला. या विविध मंथनातून आता महिलांची व मुलींची सामाजिक प्रश्नांची जाण वाढू लागली व स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार त्यांना अस्वस्थ करु लागलं.

*****



# मोकळे आकाश



बचत गटाच्या मिटींगला काही सभासद नियमितपणे अनुपस्थित रहात होते. त्यांच्या घरच्या कटकटी, मारझोड मिटींगला जाऊ देत नाही हे लक्षात आलं. वारंवार कंबर दुखणारी, डोकं दुखणारी, भूक न लागणारी बाई – तिचं खरं दुखणं कधी कधी मनावर होणारे आघात होते, तिला होणारी मारझोड होती, नि म्हणूनच स्त्रियांचे आरोग्य आणि त्यांच्यावरील हिंसा यांची उकल समजून घेणं सर्वांना गरजेचे वाटले. सुरवातीस भारत वैद्य कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण झाले. यात हिंसा म्हणजे काय इथून सुरुवात झाली नि कार्यकर्त्यांनी स्त्रियांवर जी विविध प्रकारची हिंसा होते याची लांबलचक यादी तयार केली. अशा प्रसंगांना तोंड कसे द्यायचे याचेही प्रशिक्षण पाठोपाठ होणे स्त्रियांना खूप गरजेचे वाटले नि त्यातून पुढचे प्रशिक्षण झाले. गावात या प्रश्नांना जोडून घेण्यास बचत गट

उत्सुक होते म्हणून ५० गावातून बचत गटाच्या सर्व सदस्यांना हिंसा म्हणजे काय, त्याला तोंड द्यायला आपण काय करावे याचे प्रशिक्षण संस्थेने दिले. घरात, गल्लीत व गावात यासाठी काय तरतूद असावी याचे आराखडे तयार झाले. भारतीय घटना, त्यातून आलेले अधिकार, महिला विषयक कायदे यांची प्रशिक्षणे घेण्यात आली. या विषयाकडे संवेदनशीलतेने व स्त्रियांच्या दृष्टीकोनातून पाहावे यासाठी पोलिसांचे, वकिलांचे, डॉक्टरांचे प्रशिक्षणही संस्थेने घेतले. उस्मानाबादमध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी वकील, डॉक्टर्स व पोलिस यांची एकत्रीत कार्यशाळा न्यायालयाच्या आवारातच घेण्यात आली. तालुका पातळीवर महिलांचे मेळावे घेण्यात आले त्यात नाटीका सादर झाल्या. स्त्रियांवरील अन्याय अत्याचार या विषयाला धरुन असलेल्या या नाटकांचा महिलांवर खूप प्रभाव पडला. मेळाव्यामध्ये काही स्त्रिया साश्रूनयनांनी त्यांच्या स्वत:च्या कहाण्या सांगू लागल्या. काहीजणी म्हणत – 'रडत खडत किती दिवस जगणार या सगळ्याला तोंड द्यायला आपण स्वत:च खंबीर व्हायला हवे'. प्रशिक्षणापूर्वी हिंसा म्हणजे काय हे न समजलेल्या 'मारणार नाही तो नवरा कसला' नि 'नवऱ्याने नाही मारायचे तर कुणी' इथून सुरु झालेला हा प्रवास आता विविध वळणे घेऊ लागला. आता मारहाणीला बायका प्रतिकार करु लागल्या, बैठकीत त्यांच्या मोकळ्या चर्चा घडू लागल्या. एखाद्या स्त्रीवर अत्याचार झाल्यावर गटातल्या महिला तिला धीर देण्यास मार्ग काढायला मदत करु लागल्या, घरातल्या प्रकरणांची सार्वजनिक वाच्यता होऊ लागली. सार्वजनिक बभ्रा होऊ नये म्हणून लोकही घाबरून राहू लागले. संघटित विरोधाची जरब वाढली घरात चार भिंतीतला अत्याचार हा एक सार्वजनिक आरोग्याचा भाग आहे ही जाण आली व त्यासाठी सावली केंद्राची स्थापना २००२ साली संस्थेने केली.

परिसरात झालेल्या स्त्रियांवरील हिंसाचाराच्या काही घटनानंतर सर्व बचत गटांनी एकत्र येवून उस्मानाबादच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा काढला व आपल्या मागण्या जिल्हाधिकाऱ्यांना सादर केल्या. स्त्रियांच्या संघटित शक्तीचे ते प्रदर्शन उस्मानाबाद जिल्ह्याच्या इतिहासात 'न भूतो न भविष्यती' असे होते. उस्मानाबादच्या जिल्हाधिकारी कार्यालयावरील प्रचंड मोर्चाने अशा प्रश्नावर महिलांमध्ये किती जागृती आहे व त्यांच्या भावना किती तीव्र आहेत याची जाणीव शासकीय यंत्रणेलाही झाली. त्याची जरबही असा अन्याय करणाऱ्या लोकांना बसली. संघटित विरोध होऊ शकतो ही भीतीही लोकांना वाटू लागली आहे. गर्भलिंग निदान विरुध्द अभियान राबवण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक महिला मेळावे घेतले. त्याचा परिणाम म्हणून २६ स्त्री गर्भाचे गर्भपात थांबवण्यात यश मिळाले. तसेच कलापथकानं वेगळ्या मार्गानं



प्रबोधन करण्याचं ठरविलं. या विषयावर असलेली ''जागर'' ही व्हिडीओ सी.डी. दाखवून त्यानंतर उपस्थित स्त्री–पुरुषांशी संपर्क साधत खुली चर्चा घडवून आणली. एकूण १४ गावात याप्रकारे जे कार्यक्रम झाले त्याला गांवातील मान्यवरही उपस्थित होते. त्यांनाही चर्चेत सहभागी करुन घेण्यात आलं. ज्या लोकांना गर्भलिंग निदान करण्यात कांहीच गैर वाटत नव्हतं त्यापैकी बऱ्याच जणांनी नंतर आपण चुकीच्या पध्दतिनं विचार करत असल्याचे मान्य केलं.

या सर्व अभियानाचे अनेक फायदे झाले. ज्या घरातील महिला कधीच कोणत्याही सार्वजनिक कार्यासाठी घराबाहेर येत नव्हत्या त्या विविध उपक्रमात सहभागी होताना दिसू लागल्या. बचतगटाच्या कार्यकर्त्या सार्वजनिक हळदीकुंकवाचे कार्यक्रम आयोजित करत पण त्यात फक्त हळदीकुंकु न देता महिलांच्या आरोग्याची माहिती देत, शिवाय वाण म्हणून केवळ जीवनावश्यक वस्तूच लुटत असतात. याचाच पुढचा भाग म्हणजे सर्व गरोदर महिलांचे एकत्रित डोहाळ जेवणाचे कार्यक्रम करण्यात आले. त्या निमित्तानं एखादं छोटं मोठं नाटक बसवलं जाई. कलापथकाच्या माध्यमातून गाणी बसवणं, नाटक बसवणं आदी अनेक गोष्टी केल्या जातात. वर्षभरात झालेल्या लग्नातील नववधूंचे स्वागत व त्यांच्या सासूंच्या सत्काराचा एक अभिनव कार्यक्रम संस्था घेते. त्यावेळी त्या नववधूला संस्थेच्या कार्याची माहिती दिली जाते. सासूनं नववधूला स्वत:च्या मुलीसारखं वागवावं यासाठी तिचा सत्कार केला जातो. या उपक्रमाचा मूळ हेतू एकतर त्या दोघींनाही आपली दखल घेतली जाते हे जसं जाणवते त्यासोबतच सुनेला एकटेपणाची भावना न रहाता आपल्या पाठीशी काळजी घेणारे कोणीतरी

आहे व वेळप्रसंग पडल्यास त्यांचा भक्कम आधार आपल्याला मिळू शकतो हा विश्वास वाटतो.

अभ्यासातून असं लक्षात आलं की, ज्यांचे बालविवाह झाले होते अशा काही महिला अन्याय, अत्याचाराच्या बळी ठरत होत्या. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पूर्वीपासूनच बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे, त्यामुळं याबाबतही प्रबोधन करण्याचं ठरलं. ग्रामीण भागातील परंपरागत अंधश्रध्दा बदलण्याचं प्रभावी माध्यम म्हणजे कलापथक होय. त्यामुळं हेच माध्यम जास्त उपयोगी ठरु शकेल हे उघड होतं. त्यानुसार कार्यकर्ता प्रबोध कांबळे यानं बालविवाहावर एक नाटक लिहिले. या नाटकाचे प्रयोग बालविवाह प्रतिबंध अभियानात करण्याचं ठरलं. अभियानाची १५ दिवस आधी पूर्ण तयारी होती. गावच्या सरपंचाना लेखी पत्र व समक्ष भेटीत अभियानाचा हेतू स्पष्ट केला होता. बहुतांश ठिकाणी सरपंचाचा सकारात्मक प्रतिसाद असल्यानं मंडप, लाऊडस्पीकर आदी सर्व खर्च गांवानं केला. जेथे हे शक्य नव्हतं तेथे संस्थेनं खर्च केला. अवघ्या २० दिवसांत २१ प्रयोग झाले. लोकांचा प्रतिसाद प्रचंड होता. पाचशे ते दोन हजारापर्यंत लोकांची उपस्थिती होती. अभियानाचा परिणाम असा झाला की, होणारे बालविवाह लोकांनीच प्रतिकार करुन थांबवले. एका ठिकाणी तर साखरपुड्याच्या कार्यक्रमानंतर विवाहाचा दुप्पट खर्च कशाला म्हणून गावजेवणाची नेहमीची प्रथा मोडून कमी खर्चात विवाह उरकला गेला. धनगरवाडीसारख्या लहान गावात तीन बालविवाह महिलांनी रोखले. किशोरी गटाच्या एका सदस्याचं ९ वी शिकत असतानाच लग्न ठरलं होतं पण तिनं ठाम विरोध केला व १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय लग्न करणार नाही असं ठणकावून सांगितलं. हिंसाचाराच्या अनेक कारणापैकी ८० टक्के प्रकरणात नवऱ्याची व्यसनाधीनता हे प्रमुख कारण असल्यानं त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम कुटुंबावर होतो. हे महिलांच्या लक्षात आलं होतं. त्यामुळं बालविवाह प्रतिबंधक अभियानासारखे व्यसनमुक्ती अभियानही राबवायला हवे अशी मागणी बचत गटाच्या महिला करु लागल्या होत्या. संस्था महिलांना बचत करायला सांगते पण त्याचसोबत जर नवऱ्याचं व्यसन गेलं तर त्या व्यसनावर होणारा खर्च वाचेल व ती रक्कम कुटुंबासाठी वापरता येईल असं त्यांनाच जर समजावून सांगितलं तर ते जास्त परिणामकारक ठरेल असेही महिलांचे म्हणणे होते. त्या मागणीनुसार संस्थेनं व्यसनमुक्ती अभियानही हाती घेतलं. १० दिवसात २२ गावात हे अभियान राबवलं गेलं. अभियानापूर्वी बचतगट, भारत वैद्य सहाय्य समिती, ग्रामपंचायत, गांवातील युवक मंडळ आदी सर्वांशी चर्चा केल्यानंतर ग्रामपातळीवर अभियानाचा




निर्णय घेण्यात आला. माध्यम न वापरता गाणी, दिंडी, भाषणं आदींचाही समावेश करण्याचं ठरलं. त्यासाठी या विषयावर अधिकारवाणीनं बोलू शकतील अशा व्यक्तींची यादी करुन वेगवेगळ्या गावात त्यांच्या कार्यक्रमासाठी तारखा निश्चित झाल्या. व्यसन सोडलेल्यांच्या अनुभव कथनाचाही समावेश होता. विशेष म्हणजे या अभियानाचा सर्व खर्च संस्था करणार होती. या अभियानाचा परिणाम असा झाला की कार्यक्रम सुरु असतानांच लोक स्टेजवर येऊन व्यसन सोडल्याचं जाहीर करत. तंबाखू, गुटखा खाणारे आपली पानाची चंची, बटवा, अडकित्ता सगळे लोकांसमोर आणून टाकत व व्यसन सोडल्याची शपथ घेत.

व्यसनाचं प्रमाण किती असावं ? मानेवाडीचा विशेष असा की या गावात तंबाखू खाणाऱ्यात पुरुषापेक्षा महिला व लहान मुलांची संख्या जास्त होती. शहापूर गावात रोज तीन हजार रुपयांपेक्षा जास्त दारु विक्री होत असे. एक काळ असा होता की, गावात कोणताही सार्वजनिक कार्यक्रम होऊ शकत नव्हता कारण त्यात गावचे दारुडे मध्ये येऊन गोंधळ घालत व कार्यक्रम होऊ देत नसत. आता तेथे दारुबंदी होऊन ४–५ वर्षे झाली पण आजही ती अंमलात आहे. केशेगावात बचतगटाच्या महिलांनी दारुबंदी करुन दाखवली. रात्रभर पहारा देऊन विक्री होऊ दिली नाही व सर्व अड्डे उध्वस्त केले. धनगरवाडीत ग्रामस्वच्छता अभियानात सहभागी झाल्यावरही दारुविक्री सुरुच होती. बचत गटाच्या महिलांनी या अभियानात सहभाग घ्यायचा तर दारुबंदी झालीच पाहिजे असे ठणकावून सांगितलं. दारु विकणाऱ्या दुकानांवर थेट मोर्चा नेला. तेथे असलेल्या बाटल्या फोडल्या. दुकानदाराला मोर्चा येणार असल्याचा

सुगावा आधीच लागलेला असल्यानं त्यानं दारुचे डबे दुकानाच्या मागं असलेल्या ऊसाच्या शेतात पुरुन ठेवले होते. पण बायका इतक्या हुशार की त्यांनी ते देखील शोधून काढले व टायर्स, डबे फोडून टाकले. नंतरच्या काळातही नागूर, हिप्परगा रवा, भातागळी, खेड, देवसिंगा तूळ, होर्टी, खुदावाडी या गांवात दारुबंदी करण्यात आली.

## सावली केंद्र :

स्त्रियांचं आरोग्य आणि हिंसा यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. कौटुंबिक व सामाजिक हिंसेचा स्त्रियांच्या मानसिक व प्रजननात्मक आरोग्यावर परिणाम होतो. स्त्रियांवरील हिंसाचाराकडे फक्त मानवी हक्काच्या भूमिकेतूनच नव्हे तर सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही बघितलं पाहिजे. गटाच्या बैठकीत महिला एकमेकींच्या कुटुंबातील अडचणीबद्दल तसेच त्यांच्यावर घरातून, पति, सासू–सासरे व इतरांकडून होणाऱ्या अन्याय–अत्याचाराबाबत बोलू लागल्या. अशा महिलेला गटातील स्त्रिया आधार देऊ लागल्या. त्या महिलांच्या अडचणींची कोठेतरी दखल घेतली जावी यासाठी संस्थेने स्वतंत्र अशा ''सावली केंद्राची'' स्थापना २००२ मध्ये केली. अणदूर येथे सावली केंद्रामध्ये येणाऱ्या महिलांवर मानसिक, शारीरिक आणि लैंगिक अत्याचार होत असल्याचं स्पष्ट झालेलं आहे. यामध्ये अत्याचाराचे प्रकार विषद करताना प्रामुख्यानं खालील प्रकारचे वर्गीकरण करता येईल.

**भावनिक तथा मानसिक अत्याचार :** यामध्ये स्त्रीचा अपमान करणं, तिला टोमणे मारणं, दोष देणं, शिवीगाळ करणं, आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणं, नातेवाईक किंवा जवळच्या संबंधितांना भेटू न देणं, माहेरच्या माणसांना विनाकारण दोष देणं, चारित्र्यावर जाणूनबुजून खोटा आरोप करणं, दुसऱ्या व्यक्तिसमोर पाणउतारा करणं, उपाशी ठेवणं वगैरे.

**शारीरिक अत्याचार :** अशा अत्याचारामध्ये थप्पड मारणं, लाथ मारणं, जळत्या लाकडानं चटके देणं, मारण्यासाठी काठी, सळईचा उपयोग करणं, गळा दाबणं, केस ओढणं, चाकूसारख्या तीक्ष्ण हत्यारानं ओरखडणं, गरोदरपणात पोटावर ठोसे मारणं वगैरे.

**लौंगिक अत्याचार :** महिलेच्या इच्छेविरुध्द शारीरिक संबंध ठेवणं, स्त्रीच्या शरीराच्या नाजूक भागांशी हिंस्त्रपणे छळ करणं, लैंगिक अत्याचाराची धमकी देणं वगैरे.

अशा पार्श्वभूमीवर सावली केंद्र अत्याचारित स्त्रियांसाठी सकारात्मक दृष्टीकोनातून मदतीचा हात देत आहे. केंद्रामध्ये अशा स्त्रियांच्या भावनेची कदर केली जाते, त्यांना सकारात्मक विचार करण्यास प्रवृत्त केलं जातं. अन्यायास वाचा फोडण्याची क्षमता वाढवण्यामध्ये मदत केली जाते. त्यांची वैचारिक प्रगल्भता वाढवली जाते. त्यांच्यात विचारांची देवाणघेवाण करण्याची वृत्ती जोपासली जाते. त्यांना समान हक्कांची जाणीव करुन दिली जाते. अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरं जाण्याची क्षमता वाढविली जाते. त्यांचं व्यक्तिमत्व घडविण्याची संधी देऊन स्वावलंबनाची दिशा दाखविली जाते.

अशाप्रकारच्या २०९ प्रकरणांची लेखी नोंद सावली केंद्रानं केली आहे. यात हुंडाबळी हे एक टोक आहे. जास्तीत जास्त प्रकरणं ही व्यसनाधिनतेमुळे होणारी मारहाण, शारीरिक, मानसिक छळ, पतिची संशयीवृत्ती, पुरुषत्व नसणं, काही प्रकरणात नवरा–बायकोचं जमत नाही अशा अनेक प्रकारच्या प्रकरणांच्या नोंदी सावलीनं केल्या आहेत. या अर्जामध्ये काडीमोड मिळणेबाबतचे अर्ज आहेत. तक्रार अर्ज आल्यानंतर प्रथम तक्रार अर्ज करणाऱ्या व्यक्तीस त्याची अतिशय सखोल व सविस्तर माहिती विचारुन केसहिस्ट्री लिहून घेतली जाते. याच्या अनुषंगानं विरुध्द बाजूच्या लोकांना प्रथम पत्राद्वारे संबंधीत तक्रार अर्जासंबंधी चर्चा करण्यासाठी बोलाविलं जाते. नंतर त्यांची एकत्र बैठक घेऊन चर्चा केली जाते. या बैठकीस प्रमुख व्यक्ती, इतर प्रतिष्ठीत व्यक्ती, नातेवाईक उपस्थित असतात. अशाच पध्दतीनं प्रकरणाच्या कारवाईस सुरुवात होते. एका प्रकरणाच्या तडजोडीसाठी २–३ महिन्याचा कालावधी जातो. या सर्व प्रकरणामध्ये सावली केंद्र हे दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेऊन दोन्ही पक्षांच्या हितांच्या दृष्टीकोनातून सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न करित असते.

सावली केंद्राकडं आतापर्यंत २०० पेक्षा जास्त महिलांवरील अत्याचाराच्या माहितीचे संकलन करण्यात आलं आहे. आतापर्यंत एकूण २०९ तक्रारी नोंदवण्यात आल्या त्यापैकी ७७ प्रकरणात समेट घडवून आणण्यात केंद्राला यश मिळालं. २० प्रकरणं न्यायालयाकडे वर्ग झाली तर कारवाई करुनही २८ प्रकरणात प्रतिसाद मिळाला नाही. कार्यवाही सुरु असलेली ५० प्रकरणं प्रलंबित आहेत. एका प्रकरणात घटस्फोट झाला तर १७ प्रकरणं स्थगित आहेत. सावली समुपदेशन केंद्रानं महिलांच्या बाबतीत खूपच जिव्हाळ्याची भूमिका घेतली आहे. सावलीची कार्यप्रणाली ही प्रामाणिक व

निपक्ष:पातीपणाची आहे.

सावली केंद्राच्या व्यतिरिक्त अनेक प्रकरणे गांवपातळीवरच महिला केंद्रांनी स्वत:च्या मध्यस्थीनं सोडवली. महाराष्ट्र राज्य महिला आयोगानं या केंद्राचं काम पाहून तुळजापूर तालुक्यात तालुकास्तरीय समुपदेशन केंद्रास मंजुरी दिली संस्थेच्यावतीने गेल्या ४ वर्षापासून तुळजापूर येथे हे केंद्र कार्यान्वित आहे.

*****



# आत्मभान



हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या आरोग्यविषयक उपक्रमाची आखणीच मुळात महिला आणि बालकांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्याला आरोग्य म्हणायचे की अनारोग्य हाच मोठा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील ६० ते ७० टक्के गरोदर स्त्रियांमध्ये रक्तक्षयाचे प्रमाण आढळते. आईच सशक्त नसल्यानं तिच्या उदरात वाढणारं मूलही अशक्त बनतं व अशा रितीनं जन्मणारं मूल कुपोषित असण्याचं प्रमाणही साहजिकच वाढतं. या प्रश्नाला सांस्कृतिक, लिंगभाव असमानता, आर्थिक, सामाजिक अशी अनेक कारणं आहेत. दैनंदिन श्रमाच्या ओझ्यानं महिला दुबळ्याच बनत जातात. त्यामुळं समाजातील आर्थिकदृष्ट्या वंचित असणाऱ्या महिलांचं आरोग्य आणि जीवनमान वाढवणं हेच ध्येय संस्थेनं ठरवलं. स्त्रियांत

मुळात आत्मविश्वास वाढवला पाहिजे. त्यासाठी त्यांना स्वत:च्या शरीराचं किमान ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी स्त्रियांना परंपरेच्या जोखडातून मुक्त करतांनाच अंधश्रध्दा, स्त्रीपुरुष असमानता इत्यादी प्रश्नाकडं डोळसपणे पहायला शिकवणे गरजेचे ठरते. स्वत:ला मूल होऊ द्यायचं की नाही यापासून ते मुलांच्या शिक्षणापर्यंतचे सर्व निर्णय, घरातील आर्थिक प्रश्नांचे निर्णय घेताना तिचा सहभाग आवश्यक बनला पाहिजे. यानंतरचा टप्पा हा सामाजिक निर्णय प्रक्रियेचा येतो. गावच्या प्रश्नात निर्णय घेतानाही तिचा सहभाग असायला हवा व त्यासाठी महिलांच्या सक्रीय संघटना तयार व्हायला हव्यात. यासाठी महिलांनी स्वत:पासून सुधारणा करायला हवी. त्यांचे राहणीमान, जीवनमान सुधारण्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे. त्यासाठी त्यांच्या घराच्या परिस्थितीत सुधारणा गरजेची ठरते. यासाठी त्या घराच्या उत्पन्नाला व्यवसायाची जोड हवी व त्यासाठी पैसा हवा. हा पैसा उपलब्ध करण्यासाठी मग बचतगटाची संकल्पना आली. त्यातून बचतगटांचे संघटन झाले व या सर्व प्रक्रियेतून महिलांचे सबलीकरण होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्यातूनच एकमेकाला पूरक कार्य करणाऱ्या व सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची एक साखळी तयार झाली ज्यातून शांततापूर्ण समृध्द समाज निर्माण होईल व पुढची पिढी केवळ सुशिक्षितच नाही तर सुसंस्कृतही बनेल हा विश्वासही वाटू लागला.

स्त्री आणि पुरुष या दोघांचाही समान सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी आधी संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपासून सुरुवात करण्यात आली. या कार्यकर्त्यांची साधारणपणे वर्षात दोन या पध्दतीनं प्रशिक्षण शिबिरं घेण्यात आली. या प्रशिक्षित कार्यकर्त्यांकडून गावपातळीवर स्त्रिया व पुरुषांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला. पुरुषांना या प्रकल्पात सहभागी करण्यासाठी भारत वैद्य सहाय्यक समिती स्थापन केली गेली. प्रत्येक गावातील विविध क्षेत्रातून निवडलेल्या सदस्यांच्या या समितीच्या माध्यमातून व त्यांच्या सहली काढून विविध विकासात्मक प्रकल्प दाखवले गेले. त्यात सेंद्रिय शेती प्रकल्प, आधुनिक पध्दतीने केली जाणारी शेती, यासोबतच आदर्श ग्राम असलेले पोपटराव पवारांचे हिवरेबाजार, अण्णा हजारेंचा राळेगणसिध्दी प्रकल्प आदींचा समावेश होता. या सदस्यांना संस्थेच्या विविध प्रशिक्षण शिबिरातही सहभागी करुन घेतले गेले. महिलांना बचतगट माध्यमाची माहिती देण्यात आली व स्त्रियांच्या आरोग्यावरील वेगवेगळ्या डॉक्युमेंटरीज दाखवल्या गेल्या. तसेच संस्थापातळीवरील सर्व उपक्रमात त्यांना सहभागी करुन घेण्याचे जाणीवपूर्वक

प्रयत्न केले गेले. शासनाच्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या निमित्तानं गावाच्या विकासाच्या प्रश्नावर संस्था प्रत्यक्ष सक्रिय सहभागी असते हे गांवकऱ्यांच्या लक्षात आल्यानं ते संस्थेच्या जास्त जवळ आले व त्यांनाही संस्थेच्या कामाबद्दल आपुलकी वाटायला लागली.

संस्थेच्या संपर्कात कोणत्याही कारणानं आलेल्या महिला पूर्वी स्वत: आणि नंतर आपला बचतगट एवढ्यापुरताच मर्यादित विचार करत असत. पण जसजशी त्यांची जाणीव, जागृती वाढत गेली तसा त्या आता सार्वजनिक विचार करु लागल्या आहेत. गांवची सडक, स्वच्छता, रस्त्यावरचे पोल, पाणीपुरवठा इत्यादी सर्व दैनंदिन प्रश्नाविषयी त्या जागृतीने आपला हक्क बजावायला शिकल्या आहेत. आता या महिला ग्रामसभेत सहभागी होऊन ठामपणे आपले विचार व्यक्त करतात, मागण्यांचे ठराव मांडून ते संमत करतात, त्याचा पाठपुरावा करतात. यावर्षीच्या ग्रामपंचायत निवडणुकीत ३८ महिला निवडून आल्या. त्यापैकी ३ तर बिनविरोध निवडून आल्या आहेत. तंटामुक्त समित्यांवर लोहारा तालुक्यातून १५ महिला, तुळजापूर तालुक्यातून १० भारत वैद्य कार्यकर्त्या निवडल्या गेल्या. तसेच आरोग्य, पाणीपुरवठा व स्वच्छता आदी विविध समित्यांवर लोहारा तालुक्यातील १८ तर तुळजापूर तालुक्यातील १५ महिला निवडल्या गेल्या. संस्थेनं राबवलेल्या कार्यक्रमानुसार प्रत्येक गांवातील पांच याप्रमाणं जवळपास २५० ते ३०० महिला नेतृत्व करण्यासाठी प्रशिक्षित होऊन तयार झालेल्या आहेत हे विशेष.

या भगिनी आता राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होतात. ध्वजवंदन कार्यक्रमात त्या हिरीरीनं भाग घेतात, एवढचं नव्हे तर भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात तर त्यांचा सिंहाचा वाटा असतो. अनेक गावांमधून स्वस्त धान्य दुकानातील रेशन व रॉकेलच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात या महिलांनी निवेदन, तक्रारी, मोर्चा, उपोषण हे मार्ग तर अवलंबलेच शिवाय अनेक वरिष्ठ अधिकारी व पालकमंत्री महोदयासमोर धीटपणे सर्व प्रकार कथन केले. त्याचा परिणाम होऊन मंत्र्यांनी चौकशी करविली व तक्रारीची खातरजमा करुन संबंधितांचा परवाना रद्द करुन तो इतरांना दिला. शहापूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात संबंधित नर्स रहातच नव्हती तिची तक्रार केली व तिला त्या केंद्रात रहाणे भाग पाडले. याच केंद्रात वेळीच उपचार न मिळाल्यानं एका मुलीचा मृत्यू झाला होता. गांवच्या सर्व लोकांनी संघटितरित्या तक्रार केल्यावर या उपकेंद्रात पर्यायी व्यवस्था म्हणून त्या ठिकाणी काम करणाऱ्या भारत वैद्य कार्यकर्तीने काम करावे अशी विनंती

करण्यात आली. निलेगांव येथे हिंदू–मुस्लिम हा खूप जुना वाद होता. तिथे महिला एकमेकांच्या घरी देखील जात नव्हत्या पण या महिलांनी स्वत:च पुढाकार घेऊन हा प्रश्न सोडवला व आता तर हिंदू व मुस्लिम महिला एकमेकींच्या घरीही जाऊ लागल्या आहेत. हराळीचे तर फार वेगळे उदाहरण आहे. इथे खाऊ वाटप म्हणून खिचडी शिजवणाऱ्या महिलेच्या पतीचे एडस्ने निधन झाले. पण त्याची शिक्षा मात्र त्या बिचारीला भोगावी लागली. गांवकऱ्यानी त्या महिलेला खिचडी शिजवण्याच्या कामावरुन चक्क काढून टाकण्याचे ठरवले होते. इथे काम करणाऱ्या भारत वैद्य कार्यकर्तीने गांवकऱ्यांची बैठक घेऊन एडस् रोगाची माहिती देऊन त्याचा प्रसार कसा होतो हे समजावून सांगितले. एचआयव्ही पॉझिटीव्ह असलेल्या त्या महिलेने खिचडी शिजवल्यानं एडस्चा प्रसार होत नाही हे लोकांना पटल्यावर त्या महिलेला परत कामावर ठेवणे भाग पडले. ग्रामसभेत या विषयावर सर्वासमक्ष चर्चा झाली व हा प्रश्न मिटला. नागूरच्या ग्रामसभेत महिलांनी बंद असलेली सार्वजनीक शौचालये स्वत: ताब्यात घेऊन तेथे स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी उचलली.

लिंगभाव समानतेचा विचार प्रथम आपल्या कार्यकर्त्यात रुजला पाहिजे यासाठी संस्थेनं त्यांच्यासाठीच आधी प्रशिक्षण देण्याचं ठरवलं. त्यासाठी बायफ या संस्थेचे सहकार्य घेण्यात आले. आपल्या देशातील परंपरागत पुरुषप्रधान संस्कृतीमुळं स्त्रियांवरील अत्याचाराचं प्रमाण जास्त आहे. स्त्रीला आपल्या समाजरचनेत कोणत्याही निर्णय प्रक्रियेत फारसे स्थान नाही. त्यामुळं घरकामाचा भार स्त्रियांवर जास्त असतो त्याला भारत वैद्य कार्यकर्ती देखील अपवाद नसल्यानं आधी त्यांचं व त्यांच्या पतीचं एकत्रित प्रशिक्षण शिबीर घेण्यात आलं. त्यांना हे सप्रमाण पटवण्यासाठी त्यांच्या दिवसातील चोवीस तास स्त्रिया व पुरुष करत असलेल्या कामांची वेगवेगळी यादी करावयाची होती. यात पुरुषांची कामे फक्त ७ ते ८ म्हणजे सर्वात कमी असतानाही त्यांना भरपूर विश्रांती मिळत होती. उलट स्त्रिया २४–२५ कामे करत असल्या तरी त्या मानाने त्यांना विश्रांती मिळत नव्हती हे या निमित्तानं लक्षात आलं. स्त्रिया परंपरेनं चालत आलेले उपवास करतात यामुळे त्यांच्या आहारावरही विपरीत परिणाम झालेला होतो. या शिबिराचा खूप चांगला परिणाम पुरुषांवर झालेला नंतर दिसला, पुरुषांनी स्त्रियांना घरकामात मदत करायला सुरुवात केली. बदललेल्या परिस्थितीमध्ये व स्त्रियांत आत्मसन्मान निर्माण झाल्यानं अनेक सार्वजनिक व सामाजिक प्रश्नांच्या निमित्तानं स्त्रिया शासकीय कचेरीत समक्ष जाऊन माहिती

घेतात व जाबही विचारतात. पण अशा वेळी शासकीय कर्मचारी मात्र त्यांचा योग्य सन्मान राखत नाहीत हे लक्षात आल्यावर त्यांचीही मानसिकता बदलणं संस्थेला गरजेचं वाटलं. त्यासाठी अशा शासकीय कर्मचाऱ्यांचीही दोन प्रशिक्षण शिबिरे संस्थेनं आयोजित केली ज्याचा चांगला परिणाम दिसून आला.

वेगवेगळ्या गावात संस्थेचे जे विविध कार्यक्रम होत त्याचे उद्‌घाटन जाणिवपूर्वक त्या गावच्या बचतगटाच्या एखाद्या कार्यकर्तीच्या हस्ते केले जाई. गांवात घराबाहेरही न पडणाऱ्या या महिला अशा कार्यक्रमासाठी उद्‌घाटक म्हणून येऊ लागल्या त्याचे कौतुक पुरुषांनाही वाटू लागले व त्यांचा महिलांनी उंबरठ्याबाहेर येण्याला असलेल्या विरोधाची धार कमी होऊ लागली. अशा पध्दतीनं जे महिला नेतृत्व उदयाला येऊ पहात होते ते पुरुषांनाही गैर वाटेनासे झाले, हे मोठे यश म्हणायला हवे. गावोगाव ज्या भारत वैद्य सहाय्यक समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या त्यातही तीस टक्के महिला सदस्य असाव्यात अशी संस्थेनं अटच घातलेली होती. किशोरवयीन मुलींचे जसे गट स्थापन झाले तसे त्या गावात किशोरवयीन मुलांचेही गट स्थापन झाले. संस्थेने वेगवेगळ्या शाळांना आरसा, कंगवा, नेलकटर, साबण आदी वस्तूंचे संच भेट दिले आहेत. गांवातील निरक्षर स्त्रियांसाठी संस्थेनं सहा महिन्यांचे साक्षरतावर्ग ५० गांवात सुरु केले. या उपक्रमात बचतगटाच्या ७०० निरक्षर महिला साक्षर झाल्या हे विशेष.

बचत गटाच्या महिलांना बैठकांना हजर रहाता यावे यासाठी त्या वेळेतील तिचे काम पुरुषांनी करावे असाही प्रयत्न झाला. विविध राष्ट्रीय कार्यक्रमानिमित्त जे झेंडावंदन केले जाते. त्या दिवशी इतर उपक्रमांसाठी महिला निधी गोळा करु लागल्या. बचतगटाच्या महिलांनी मोठ्या प्रमाणात अशा कार्यक्रमाला हजर रहावे, एवढेच नव्हे तर हे झेंडावंदन शक्यतो महिलेच्याच हस्ते व्हावे असेही प्रयत्न यशस्वी ठरले.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील अनेक गावांच्या बचतगटाच्या कार्यकर्त्यांच्या जेव्हा सहली काढण्यात आल्या तेंव्हा पहिल्यांदा साहजिकच त्यांचा ओढा देवस्थानांचा होता. पण संस्थेने जाणिवपूर्वक देवस्थानासोबत त्याच्या आसपासची सामाजिक तिर्थक्षेत्रेही दाखवली. त्यात गुजरातमधील बायफ संस्थेचे वाडी प्रकल्प, काजू, लोणचे प्रक्रिया प्रकल्प, जव्हार, कोपरगांव व वडापूरचे दुग्ध व्यवसाय प्रकल्प, विदर्भातील आनंदवन, राजगुरुनगरची चैतन्य संस्था, पंढरपूरचा नवरंगे बालकाश्रम आदींचाही सहभाग होता. महिलांनी या वेगवेगळ्या सहलीच्या निमित्ताने वणी, शिर्डी, देहू, आळंदी आदी देवस्थानांचे दर्शन घेतले.

या सहलींसाठी येणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च संस्था करत असे तर उर्वरीत खर्च महिला त्यांच्या बचत गटाच्या उत्पन्नातून करत असत. साधारणपणे १५०० महिलांनी या सहलीचा लाभ घेतला.

बचतगटात आल्यानं महिलांची हक्काबद्दलची जागरुकता वाढलेली होती. अंगणवाडीत देण्यात येणारा पोषक आहार योजनेतील आहार योग्य नसल्यास वा कमी असल्यास त्या भांडून योग्य आहार देण्यास भाग पाडतात. गांवात ठराविक दिवशी लसिकरण न झाल्यास ग्रामपंचायत, आरोग्य केंद्रात जाऊन तक्रार नोंदवतात. चिक्रुंद्रा गावच्या महिलांनी पाण्यासाठी ग्रामपंचायतीवर मोर्चा काढला होता. होर्टी आणि दहिटणा येथे महिलांनी पाणी साठवण्यासाठी कसलीही सोय नव्हती म्हणून साठवणीचा हौद बांधून घेतला. वडाच्या तांड्याच्या महिलांनी पिण्याच्या पाण्याच्या हौदासाठी केलेली मागणी संस्थेनंही मान्य केली व हौद बांधला गेला. बेलवाडीची एक महिला बचत गटातून कर्ज घेण्यासाठी आली होती. कर्ज कशासाठी हवे याचे कारण मात्र ती सांगायला तयार नव्हती. भारत वैद्य कार्यकर्तीने खोदून खोदून विचारल्यावर त्या महिलेच्या मुलीला सासरी नांदवत नव्हते व त्यांनी नांदवावं म्हणून एका साधूनं तिला पूजा विधी करायला सांगितलं होतं, त्यासाठी तिला पैसे पाहिजेत हे कारण सांगितलं. त्या कार्यकर्तीला त्या साधूच्या हेतूबद्दल संशय आल्यानं तिनं त्या महिलेला मला त्या साधूकडे घेऊन चल असं सांगितलं. पैसे हवे असल्यानं त्या महिलेनं नाईलाजाने कां होईना त्या कार्यकर्तीला त्या साधूकडं नेलं. कार्यकर्तीने त्याच्याशी या विषयावर बोलतांना अनेक प्रश्न विचारले तेंव्हा तो भोंदू साधू असल्याचं तिच्या लक्षात आल्यावर तिने खोटेच मोबाईलवर पोलिस स्टेशनला व गावातील इतर प्रतिष्ठितांना फोन करण्याचं नाटक करताच तो साधू पळून गेला. अनेक महिला आर्थिक लूट होण्यातून केवळ कार्यकर्तीच्या प्रसंगावधान व धाडसाने वाचल्या.

८ मार्च हा जागतिक महिला दिन. पण संस्था हा दिन न साजरा करता ८ ते १५ मार्च असा महिला सप्ताह साजरा करते. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व विभागातील सर्व गावात या काळात गावपातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शेवटच्या दिवशी समारोप होतो. या काळात गावातल्या गावात उत्पादन होणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शनही आयोजित केले जाते. याशिवाय संस्था २३ जानेवारी हा दिवस महिलांसाठी एक मुक्त दिवस म्हणून साजरा करते. त्यादिवशी संस्था पातळीवर मोठा मेळावा घेतला जातो. आत्तापर्यंत असे ९ मेळावे झालेले असून कार्यक्षेत्रातील सर्व गावच्या सर्व बचतगटाच्या सदस्य



असलेल्या व नसलेल्या महिला मोठ्या संख्येनं या मेळाव्याला उत्स्फूर्तपणे येतात. त्यांच्यासमोर संजीवनी महिला बचत संघ या बचतगटाच्या फेडरेशनचा वार्षिक अहवाल व हिशोब सादर केला जातो. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंतांचे मार्गदर्शन, आदर्श महिलांचा, बचतगटांचा व भारत वैद्य कार्यकर्त्यांचा सत्कार केला जातो. महिला आपले अनुभव मोकळेपणाने सांगतात. गाणी, विविध गुणदर्शन अशी धमाल असते. महिलांचे स्टॉल्स् असतात व त्यात त्यानी तयार केलेल्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतात. प्रत्येक मेळाव्यात नव्या वर्षाचा संकल्प जाहीर केला जातो. या पूर्वीच्या अशाच मेळाव्यात बचतसंघाची स्थापना, सावली केंद्र, संजीवनी कुटूंब – आरोग्य विमा योजना, गर्भलिंगनिदान विरुध्द अभियान, माहितीचा अधिकार अभियान असे उपक्रम जाहीर केले गेले व वर्षभर हे अभियान चालवलं गेलं. असे मोठे मेळावे आता १० वेगवेगळ्या गावात होतात. पंचायत राज उपक्रमात महिलांचा सहभाग वाढवणं, त्यांना साक्षर करणं, स्त्रियावरील हिंसाचाराला प्रतिबंध हेहि उपक्रम असतात. दरवर्षीच्या मेळाव्यात त्या त्या विषयावरील पथनाट्यानं मेळाव्याचा प्रारंभ होतो. त्या पथनाट्याच्या विषयावर महिलांच्या प्रतिक्रिया जेंव्हा विचारल्या जातात तेंव्हा महिला त्याबद्दल भरभरुन बोलतात. अनेकवेळा बोलताना त्या भावनावश झाल्यानं त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहतात. अशा मेळाव्यात भव्यदिव्यता नसते पण महिलांच्या प्रश्नाची खऱ्या अर्थाने चर्चा असते व त्यात त्यांचा मनापासूनच्या सहभाग जाणवतो. अशाच मेळाव्यातून दारुबंदीसारख्या

अत्यंत ज्वलंत व समाजातील पुरुषवर्गाचा प्रखर विरोध असलेल्या विषयांवरही महिला हिरीरीने पुढे आलेल्या दिसल्या.

पंचायत राज प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी लिंगभाव समानतेद्वारे त्यांचे संघटन करणं, त्यांच्यावरील अन्याय कमी करण्याचा प्रयत्न करुन त्यांच्या उपजिवीकेच्या साधनांची माहिती देणं, समुपदेशन करणं या सर्व गोष्टींचा या प्रकल्पाच्या कामात समावेश आहे. तुळजापूर आणि लोहारा तालुक्यातील ५० गांवातून जानेवारी २००६ पासून या कामाचा प्रारंभ झाला.

प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हे काम करणाऱ्या गावपातळीवरील संस्थेच्या प्रतिनिधीत्व करणाऱ्या भारतवैद्य कार्यकर्त्यांना आधी प्रशिक्षण देण्यात आलं. याशिवाय प्रत्येक गांवातून १०० महिलांचे संघटन करुन त्यातून पांचजणी नेतृत्व करण्यासाठी निवडण्यात आल्या. आता गावपातळीवर या महिलांच्या नेतृत्वाखाली मदतकेंद्र स्थापन केलं जाईल. गांवातील ग्रामपंचायत सदस्य, महिला सरपंच यांचंही पंचायत राज संबंधात प्रशिक्षण घेण्यात आलं होते. त्याचा परिणाम म्हणून महिला ग्रामसभेत उघडपणे बोलून चर्चेत सहभागी होऊ लागल्या. रवा हिप्परगा येथील रस्त्यावर दिवे नव्हते. गांवच्या महिलांनी ही मागणी ग्रामसभेत आग्रहीपणाने मांडली व तसा ठराव संमत करुन घेतला. आता त्या गांवात रस्त्यावर दिवे लावले गेले आहेत. धानोरी गावात शोषखड्डे घेण्यात आले. नागूर, रवा हिप्परगा येथे तर महिलांनी ठराव घेऊन दारुबंदी केली व ती अंमलात आणायला भाग पाडले. अनेक ठिकाणी रॉकेलचे वितरण सुरळीत सुरु झाले. महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव झाली तर किती बदल घडू शकतो याची ही कांही उदाहरणे आहेत.

*****



# धुमारे



## आरोग्य जागृती व अन्य उपक्रम :

समाजातील कोणत्याही स्तरातील व जातीतील गरोदर स्त्रियांना गरोदरपणाच्या काळात परिपूर्ण व पोषक आहार मिळत नाही. पण त्यांच्या आर्थिक स्तराचा विचार न करता भरमसाठ खर्च करुन त्यांच्या डोहाळ जेवणाचा कार्यक्रम मात्र थाटामाटात केला जातो. अशाच एका श्रीमंत स्त्रीचे गांवात उदाहरण घडले. या महिलेचे डोहाळजेवण खूप थाटात झाले पण तिला परिपूर्ण आहार न मिळाल्यानं तिची परिस्थिती गरोदरपणात जगते का नाही इतकी चिंताग्रस्त बनली होती. त्यातूनच संस्थेला सामुदायिक डोहाळ जेवणाची कल्पना सुचली. खुदावाडीत त्याचा पहिला प्रयोग करण्यात आला. पहिल्या व दुसऱ्या खेपेच्या २१ गरोदर महिलांचे एकत्र डोहाळ जेवण करण्याचे ठरले.

प्रत्येकीने एकेक पदार्थ घरातून करुन आणला होता. डॉ. शुभांगी अहंकारी यांनी महिलांना पोषक आहार म्हणजे काय, गरोदरपणात व नंतर घ्यायची काळजी यासंदर्भात विस्तृत मार्गदर्शन केलं. महिलांनी एकत्र भोजन केलं व या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचं कौतुकही केलं. आता हा उपक्रम बऱ्याच गांवात राबवला जातो.

पाणीशुध्दीकरणाचा उपक्रम घेण्यासाठी कारणीभूत ठरलं ते खुदावाडी गांव. हे गाव ग्रामस्वच्छता अभियानाच्या स्पर्धेत होतं. या निमित्तानं लोकांना नवीन नवीन शिकण्याची जिज्ञासा होती. त्याला जोडूनच सर्व गावात शाळा, सार्वजनिक ठिकाणं येथे पाणी अशुध्द कसे होते, ते कसे रोखता येईल, ते शुध्द कसं करावं, कसं तपासावं इत्यादीचे प्रशिक्षण बचतगटाच्या माध्यमातून दिलं. मेडीक्लोर औषध त्यासाठी कसं वापरावं हेहि सांगितलं. शाळेच्या मुलांना ही सर्व माहिती सांगितली जाई त्यांना घरी आपल्या आईवडिलाना शुध्द पाण्याचं महत्त्व सांगा असं शिकवले जाई. हा मार्ग जास्त प्रभावी ठरल्याचे नंतर आढळून आले.

बैलपोळा या पारंपारिक सणाचा आरोग्य विषयक जनजागृतीसाठी फार कल्पकपणे उपयोग करुन घेण्यात आला. बैलांच्या पाठीवर या सणाच्या दिवशी वेगवेगळ्या म्हणी लिहिल्या जात. पहिल्या वर्षी भारत वैद्य कार्यकर्त्यांनी दुसऱ्या वर्षी बचत गटाच्या महिलांनी हे काम केलं. पण तिसऱ्या वर्षापासून त्या त्या गांवातील युवक स्वत:च्या पैशानं रंग आणतात व म्हणी रंगवतात. या म्हणी तयार करताना कोणाच्या घरातल्या जनावरांच्या पाठीवर कोणत्या म्हणी



लिहायच्या याचा कल्पकतेने विचार करण्यात आला. काळ्याभोर म्हशीच्या पाठीवर, 'आईच्या दुधाला पर्याय नाही', ज्यांच्या घरी मुलीच आहेत, त्यांच्या घरातील बैलावर, 'नका धरू मुलांची आशा डोळ्यापुढे ठेवा पी.टी.उषा' 'मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश तेथे दोन्ही घरी' इ. तसेच ज्या त्या काळातील साथीच्या आरोग्याविषयी आरोग्य शिक्षण करताना याचा फायदा झाला. विशेष म्हणजे पोळ्याच्या दिवशी ५० गावातून शेकडो जनावरे रंगविली जातात. आणि पुढे दोन तीन आठवडे हा संदेश सर्वापर्यंत पोहोचविणे चालूच राहते. संस्थेनं प्रारंभी या म्हणी लिहिणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून टी–शर्ट, पिशव्या बक्षिस दिल्या पण आता तर ते बंद केले तरी युवकांचा उत्साह वाढतच आहे हे विशेष.

आरोग्याबद्दलचे भान राखण्यासाठी आरोग्य संवाद या नांवानं एक प्रशिक्षण भारत वैद्य कार्यकर्त्यांना देण्यात आलं. चार दिवसाच्या मुक्कामी प्रशिक्षण कालावधीत त्याना लोककलेच्या, गाणी, नाटक, चित्रकथा इत्यादी विविध माध्यमातून जर जनजागृती घडवून आणली तर ती जास्त परिणामकारक होईल हे पटवून सांगण्यात आलं. दोन व्यक्तीमध्ये किंवा व्यक्तीसमुहामध्ये सुसंवाद कसा घडवायचा हे तंत्र शिकवण्यात आलं. हा संवाद केवळ शब्दातच नव्हे तर कृतीतूनही घडवायचा होता. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश गावपातळीवर कार्यकर्तींच्या कामाला गती मिळावी. त्यांच्या अंगभूत कलागुणांना, कल्पनाशक्तीला वाव मिळावा. आत्मविश्वास वाढावा, समाजात काम करताना आरोग्य संवादास ठराविक दिशा मिळावी, स्वत: नाटक, गाणी, चित्रकथा, प्रश्नोत्तरे तयार करुन ती सादर करण्याची क्षमता वाढावी हा होता.

## भारत वैद्य सहाय्य समिती :

कोणत्याही गावाचा विकासकरण्याच्या अनुषंगाने जर विचार केला तर त्या गावात वेगवेगळ्या संस्था, वेगवेगळे प्रकल्प येतील–जातील, पण त्या गावात कार्यक्रमाचे सातत्य राहणे गरजेचे ठरते. गावपातळीवर विकासाच्या योजना राबवायच्या असतील तर लोकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे लोकांच्या कार्यक्रमात संस्थेचा सहभाग ही नवी व्याख्या व्हायला हवी. हॅलो संस्थेनं त्या दृष्टीनं गावपातळीवर बचत गट, युवक मंडळ, महिला मंडळ, किशोरी गट या सर्वासोबत स्थानिक संस्थानाही सहभागी करुन घेतलं आहेच. पण ज्या व्यक्तींना गांवात आदराचं स्थान आहे, ज्याला समाजिक कार्याची

आवड आहे आणि त्यासाठी कांही वेळ देण्याची तयारीही आहे, अशा व्यक्ती संस्थेनं निरिक्षणातून व गांवकऱ्यांच्या संमतीने निवडून त्यांची भारत वैद्य सहाय्य समिती प्रत्येक गावात स्थापन केली. या समितीत साधारणपणे ११ ते २१ सदस्य असावेत व त्यापैकी ३० टक्के महिला असाव्यात असा संस्थेचा प्रयत्न होता. प्रत्येक स्वयंसहाय्य गटातून निवड झालेले एक किंवा दोन सभासद, युवक मंडळातून निवड झालेले दोन सभासद, गावाच्या दृष्टीनं दोन प्रतिष्ठित व्यक्ती, ग्रामपंचायत सदस्य, किशोरी गट, क्रीडा मंडळ या तिन्हीचा प्रत्येकी एक व भारतवैद्य कार्यकर्ती यांची ही समिती बनवली जाते. त्यांच्या दर महिन्याला ठरवलेल्या तारखेला बैठका होतात, त्याचे इतिवृत्त व हिशोब असतात. ही निवड दर दोन वर्षांनी होते.

अशा भारत वैद्य सहाय्य समित्यांनी विविध गावात जी कामे केली आहेत ती खूपच कौतुकास्पद आहेत. इटकळच्या समितीत १० पुरुष व ५ महिला सदस्या आहेत. नवरात्र महोत्सवात ९ दिवस आरोग्यावरील पोस्टर प्रदर्शन आयोजित केलं होतं, लोकांना आरोग्य विषयक फिल्म दाखवण्यात आल्या कायदा, शेती, आरोग्य आदी विषयांतील तज्ञ व्यक्तींची व्याख्यानं आयोजित केली. शेतकरी मेळावे घेतले, रांगोळी स्पर्धा घेतल्या, गांवच्या युवक मंडळाच्या सहकार्यानं एक वाचनालय सुरु केले. विशेष म्हणजे या वाचनालयासाठी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडून त्यांनी १०० पुस्तके देणगीरुपाने मिळवली. संस्थेचे जे विविध उपक्रम, कार्यक्रम असतात त्यांची स्थानिक पातळीवरील नियोजनाची संपूर्ण जबाबदारी ही समिती सांभाळते.



बाभळगांवच्या समितीने पाणी पुनर्भरण केले, महिला मेळावे घेतले, वाचनालय सुरु केले. या सर्व उपक्रमांत लोकांचा मोठा सहभाग मिळवला. या समितीची राळेगणसिध्दी व हिवरेबाजारचे काम पाहण्यासाठी एक सहलही गेली होती, ज्यासाठी संस्थेनं बस उपलब्ध करुन दिली होती. संस्थेच्या कोणत्याही कार्यक्रमाच्या आयोजनात समितीचं मोलाचं सहकार्य असतं. देवसिंग्याच्या समितीची स्थापनाच ग्रामस्वच्छता अभियानाच्या काळात झालेली होती. त्यामुळं त्यांनी त्या अभियानात पुढाकार घेऊन काम केले. गावात मोठ्या व छोट्यासाठी आरोग्य शिबीरं घेतली. बचत गटाच्या महिलांना बैठक घेण्यास जागाच नव्हती. समितीने ग्रामपंचायतीकडं मागणी करुन पाठपुरावा केल्यानं मोठा हॉल त्यांना उपलब्ध झाला. शहापूरच्या समितीनं एक आपत्कालीन निधीच उभा केला. बचत गटाच्या महिलांसाठी असलेल्या विम्याचा ज्यांना आर्थिक लाभ मिळाला असेल त्या प्रत्येक लाभधारकाकडून १०० रु., बचत गटाच्या महिलांनी प्रत्येकी १० रु. समितीच्या सदस्यानी प्रत्येकी ५१ रु. रक्कम त्या निधीत जमा झाली. अशी जी रक्कम जमा होईल तितकीच रक्कम संस्थेने भरावी असेही ठरले पण त्यासाठी, या निधीचा वापर आपत्काळात व फक्त निधी देणाऱ्यांनाच मिळू शकेल अशी अट घालण्यात आली. समितीनं पुरुष व महिलांसाठी शास्त्रोक्त शेतीवर एक कार्यशाळाही घेतली.

गुळहळ्ळीची वस्ती साधारण दोन हजारांची आहे. या गावाला सन २००४ मध्ये तीव्र पाणीटंचाईशी सामना करावा लागला होता. गावात जे पाणी बोअरने टाकले जाते व तेथून नळाने पुरवले जाते ते पाणीच संपले. आता त्यांना गांवापासून २ कि.मी. अंतरावरच्या अधिग्रहण केलेल्या विहिरीतून पाणी आणावे लागणार होते. त्यामुळे समितीच्या व बचत गटाच्या महिलांनी, संस्थेनं या कामासाठी आर्थिक मदत करावी अशी मागणी केली. ग्रामपंचायत पाईपलाईन खोदण्यासाठी मजुरांचे पेमेंट देणार असेल तर संस्था पाईपसाठी पांच हजार रुपये पर्यंत रक्कम देईल असे संस्थेनं सुचवलं. शेवटी भारत वैद्य सहाय्य समितीनेच यात पुढाकार घेऊन श्रमदानानं खोदकाम पूर्ण करुन दाखवलं. संस्थेनं पाईपचा खर्च दिला व अशापध्दतीनं या गावचा पाणीप्रश्न संपुष्टात आला.

मासिक बैठकीला सभासद काही ना काही कारण सांगून येण्याचं टाळतात म्हणून या समितीनं आता वेगळीच शक्कल लढवली आहे. त्यांनी समिती सदस्यांचाच स्वतंत्र बचतगट तयार केला त्यामुळे आता आपोआपच उपस्थिती वाढली आहे.

वाचनालयाच्या माध्यमातून गांवातील सर्वच वयोगटातील स्त्री पुरुष व प्रामुख्यानं युवक संस्थेच्या संपर्कात येऊ शकतात हे लक्षात आल्यानं संस्थेनं कार्यक्षेत्रातील सर्वच गांवात वाचनालय सुरु करण्याचं ठरवलं. या दृष्टीनं जेंव्हा संस्थेनं सर्वेक्षण केलं तेंव्हा अनेक गांवात एकही वाचनालय नसल्याचं लक्षात आलं. त्यामुळं संस्थेनं पुढाकार घेऊन त्या त्या गांवातील तरुणांना एकत्र करुन त्यांचे कार्यकारी मंडळ स्थापन केलं व त्याची नंतर सार्वजनिक न्यास कार्यालयात नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरु केली. असे वाचनालय सुरु झाल्यानंतर प्रारंभीच्या काळात संस्थेनं कांही ठिकाणी आर्थिक मदतही केली. गेल्या ७ वर्षात अशा प्रकारे १५ वाचनालये सुरु करण्यात आली त्या प्रत्येकाला ५ हजार रु. ची १०० पुस्तके देण्यात आली. त्यांनी किमान ४ दैनिके वाचनालयासाठी सुरु करावीत त्यापैकी दोन वृत्तपत्रांचे बिल एक वर्षभर संस्था देईल असेही ठरले. पुस्तके ठेवण्यासाठी जे कपाट घ्यायचे त्याची निम्मी किंमत वाचनालयानं द्यावी उर्वरीत रक्कम संस्थेनं द्यावी अशी व्यवस्थाही केली गेली. युवकांसाठी वाचनालय सुरु झाल्यानं किशोरी गटानं मुलीसाठी स्वतंत्र वाचनालयाची मागणी केली तीही संस्थेने मान्य केली. आता किशोरीसाठी १५ ठिकाणी फिरते वाचनालय सुरु आहे. या योजनेत त्या वाचनालयासाठी २५ पुस्तके दिली जातात. त्या गावातल्या किशोरीनी ती वाचून झाल्याचे कळविले की, ती पुस्तकं दुसऱ्या फिरत्या वाचनालयाकडं देऊन त्यांची पुस्तके यांना दिली जातात. वागदरीच्या वाचनालयानं पुस्तकं देणगी रुपानं मिळवण्यासाठी अभिनव शक्कल लढवली. गांवकऱ्यानी आपल्या घरातील लहान मुलांच्या वाढदिवसादिवशी वाचनालयाला पुस्तकं भेट द्यावी असं आवाहन त्यानी केलं. त्याला गावकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. वर्षभरात २० पुस्तकं भेट मिळाली. गणेशोत्सवात शिल्लक राहिलेल्या रकमेतून हे वाचनालय सुरु झालं होतं हे विशेष.

वाचनालयाच्या माध्यमातून युवकांना एकत्र आणल्यावर त्यांना सातत्यानं संस्थेच्या संपर्कात ठेवण्यासाठी युवक मंडळांची स्थापना व त्यांचे मेळावे घेण्याचे ठरले. वाचनालयाचे सदस्य या युवक मंडळाचेही सदस्य असल्यानं त्यांच्या बैठका घेणं सोपं होतं. अशा मेळाव्यात मार्गदर्शन करण्यासाठी हिवरेबाजारचे पोपटराव पवार, कै. प्रा. निर्मलकुमार फडकुले, जेष्ठ पत्रकार विवेक घळसासी, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक अरविंद इनामदार, जेष्ठ पर्यावरणवादी पत्रकार अतुल देऊळगांवकर, जेष्ठ साहित्यिक विजय तेंडूलकर आदींना बोलावण्यात आलं होतं. या निमित्तानं युवकांना भविष्यकाळाची दिशा

देणं व व्यासपीठ मिळवून देणं हा संस्थेचा हेतू होता. गावोगावच्या युवकांचे संस्था पातळीवरही मेळावे घेण्यात आले. त्यामुळे युवकांनी गावच्या सर्व कार्यक्रमात भाग घ्यायला सुरुवात केली एवढंच नव्हे तर दारुबंदी अभियानात मोलाचं कार्य करुन दाखवलं.

## ग्रामीण विज्ञान केंद्र :

हॅलो मेडिकल फाऊंडेशनचा संबंध पुणे येथील 'विज्ञान वाहिनी' या संस्थेशी आला. चाळीस वर्षे अमेरीकास्थित असलेले गणिताचे प्राध्यापक श्री. मधुकर देशपांडे व सौ. पुष्पा देशपांडे यांच्या पुढाकारानं ही संस्था सुरु झाली. 'फिरती प्रयोगशाळा' ह्या माध्यमातून खेडोपाडीच्या विद्यार्थ्यांमध्ये जाते. ज्या शाळांना अनुदान नाही, त्या शाळेतील विद्यार्थी प्रयोगापासून वंचित असतात. त्यांना विज्ञानाचे त्यांच्या अभ्यासक्रमातले, प्रयोग करुन दाखवणे, विज्ञानाचे स्लाईड शो दाखवणे, काही गोष्टी हाताळून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, विज्ञानातील गमती जमती त्यांना शिकवणे असा उपक्रम विज्ञानवाहिनी तर्फे राबवण्यात येतो. हाच उपक्रम १० वर्षापूर्वी हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये सुरु झाला. यातून संस्थेचा विद्यार्थ्यांशी संबंध आला. विज्ञान शिक्षकांसाठी ही विज्ञान शिबिरे घेण्यात येऊ लागली.

हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या कार्यक्षेत्रात मात्र असे जाणवले की 'अनुदान' हा निकष योग्य नाही. अनुदान असो वा नसो सर्वसाधारणपणे बहुतेक शाळांमधल्या प्रयोग शाळांची दुरावस्था लक्षात घेत 'फिरती प्रयोगशाळा' सर्व शाळांमध्ये जाणं गरजेचं आहे व त्यानुसार सुरुवात ही झाली. प्रामुख्यानं त्याचा भर दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी असे. त्याच्या काही मर्यादाही होत्या. वर्गातले पन्नास–साठ विद्यार्थी एका दिवसात काय काय पाहणार? हाताळणार? फक्त दहावीच्या विद्यार्थ्यांपुरता हा प्रयोग मर्यादीत न ठेवता आठवी, नववीच्या विद्यार्थ्यांची ही वाढती मागणी या उपक्रमात सामील होण्यासाठी होती. जितक्या लवकर विद्यार्थ्यांना या उपक्रमात सामील होता येईल ते त्यांच्या जडणघडणीच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. त्यांच्या जिज्ञासेला वाव मिळणे, शंकानिरसन होणे. स्वत: प्रयोग करणं, अनुमान काढणं वैज्ञानिक तत्त्वं तपासून घेणं यातून त्यांच्या आयुष्याला वैज्ञानिक बैठक लाभत होती. तर्कशुध्द विचारांची सुरुवात होत होती.

यातूनच 'ग्रामीण विज्ञान केंद्राची' कल्पना पुढं आली. वर्षातून एकदा–दोनदा परिसरातल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी या केंद्रावर यावं. प्रयोग करावेत अनेक गोष्टींची देवाण–घेवाण व्हावी. या हेतूनं २००४ पासून अणदूर

येथे विज्ञान केंद्र सुरु झालं. २००४ मध्ये त्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला. सध्या ग्रामीण विज्ञान केंद्रातर्फे २८ शाळेतील १९४९ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. केवळ दहावीच्या विद्यार्थ्यांपुरते सिमित न रहाता, आठवी, नववी व दहावी या तीनही वर्गातील विद्यार्थ्यांना ग्रामीण विज्ञान केंद्राचा लाभ मिळत आहे. श्री. महादेव नरे गुरुजी अणदूरचे निवृत्त विद्यार्थीप्रिय विज्ञान शिक्षक समितीची धुरा सांभाळतात. त्यांच्या सोबत अन्य विज्ञान शिक्षकही यात हिरारीने सहभाग नोंदवत आहेत. खेडोपाडीच्या शाळा, मुलांच्या जिज्ञासा, पालकांची मनस्थिती, आर्थिक दुरावस्था यांचा विचार संवेदनशीलपणे करणारे व सामाजिक बांधिलकी मानणारे नरे गुरुजी व त्यांचे सहकारी विज्ञान केंद्राचा पुरेपूर लाभ विद्यार्थ्यांना कसा देता येईल यासाठी कटिबध्द आहेत. हा सर्व उपक्रम राबवण्यासाठी तीन विज्ञान संवादक नेमलेले आहेत. या परिसरातले विज्ञान पदवीधर व तरुण मंडळी उमाशंकर चिंचोले, बालाजी जाधव व ज्ञानेश्वर गरड यांना पुण्यास यासंबंधी प्रशिक्षण देण्यात आले.

काही वर्षापूर्वी आयुकाचे अरविंद गुप्ता अणदूरला आले होते. त्यांनी विद्यार्थी व विज्ञान शिक्षकांसाठी सुंदर प्रशिक्षण घेतले. भोवतालच्या सामुग्रीतून आपण विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान कसे पोहचवू शकतो याचे ते चालते बोलते उदाहरण होते. 'सारिणी' (पीरीऑडीक टेबल) हा विषय तसा क्लिष्ट नि अवघड. हा शिकवायला म्हणजे विज्ञान शिक्षकांनाही कसरत वाटे. फाळके सरांनी गोडसे सरांनी काही मॉडेल्स बनवून हा विषय कसा सोपा करता येईल, याचे सुंदर प्रात्यक्षिक केले नि शिक्षकांना ही खूप हायसे वाटले, कारण हा






अवघड विषय कसा शिकवायचा याचा ताण त्यांना खूप वाटे. आता ग्रामीण विज्ञान केंद्राचे काम बहुपदरी चालते. पहिल्या सहामाहीत व दुसऱ्या सहामाहीच्या पूर्वार्धात शाळांचे विद्यार्थी येथे येऊन केंद्रात स्वत: प्रयोग करतात. दुसऱ्या सहामाहीच्या सत्रात 'फिरती प्रयोगशाळा' त्यांच्या शाळेत गेल्यावर विज्ञान केंद्राकडे येऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना प्रयोग करण्यासाठी केंद्रात येऊन गेलेले विद्यार्थी मदत करतात. त्याशिवाय विज्ञानमेळे, विज्ञानदिन, आकाशदर्शन असेही कार्यक्रम होतात.

याखेरीज 'शब्दयात्रा' या अभिनव उपक्रमांचा लाभही विद्यार्थी व शिक्षक घेत आहेत. लंडन येथील श्री. मुकुंद नवाथे यांच्या काळे ट्रस्टच्या सहकार्यानं शब्दयात्रा सुरु झाली. विज्ञान केंद्रात विविध विषय, उपक्रमावरची पुस्तकं लायब्ररीतून विद्यार्थी व शिक्षकांना वाचायला मिळतात. यातून सूक्ष्म निरीक्षण, तर्कशुध्द विचार, कार्यकारण भाव विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागला आहे. उर्वरीत आयुष्यात ते सुजाण नागरिक घडतील व अंधश्रध्दांना बळी पडणार नाहीत. म्हणून या ग्रामीण विज्ञान केंद्राचे महत्त्व विशेष आहे.

गेल्या ५ वर्षापासून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यासाठी कै. विठ्ठल पुंडलीक रेगे निबंध स्पर्धेचे आयोजन हॅलो मेडिकल फाऊंडेशन करते कै. विठ्ठल रेगे यांची परदेशस्थ कन्या डॉ. ललिता गंडभीर यांच्या मदतीतून हे साकार झाले. सातवी, नववी, अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा होते. शाळांना काही पुस्तके महिनाभर देऊन, त्याचे वाचन करुन त्यावर आधारित विषय निबंधाला देण्यात येतो. वाचन, विचारांची स्पष्टता, सारासार निष्कर्ष,

अभिव्यक्तीची वृध्दी यातून होते. निबंधाचे विषय, पुस्तके, निबंध तपासणी या सर्व कामात अणदूरचे सेवानिवृत्त शिक्षक श्री. गो. का. बिच्चे गुरुजी व त्यांचे सहकारी ही धुरा समर्थपणे सांभाळतात. आजवर ८० शाळेतील २७८१ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. युवक मेळाव्यात या स्पर्धेचे पारीतोषिक वितरण होते. त्यातून अनेक मान्यवरांना ऐकण्याची संधी सर्वांना मिळते. श्री. पोपट पवार, कै. प्रा. निर्मलकुमार फडकुले, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक अरविंद इनामदार, जेष्ठ पर्यावरणवादी पत्रकार श्री. अतुल देऊळगावकर, जेष्ठ साहित्यिक श्री. विजय तेंडुलकर इ. मंडळी या निमित्ताने संस्थेच्या परिसरात येऊन गेली. गावोगाव तरुणांनी सुरु केलेली वाचनालये आहेत यासाठी हॅलो मेडिकल फाऊंडेशनने त्यांना मदत केली. सर्व तरुण या कर्यक्रमात सहभागी असतात व संस्थेच्या विविध उपक्रमात सहभाग नोंदवतात यातून तरुणांना भविष्यातली दिशा मिळते. मुंबईच्या सिध्दी विनायक गणपती न्यास तर्फे संस्था २००६ पासून होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना, अकरावी व बारावीत शिकण्यासाठी पूर्ण पुस्तकांचा संच देते. हे विद्यार्थी सूक्ष्म नियोजनातून संस्थेशी पुन्हा जोडले जातात व हे संबंध दृढ होण्यास मदत अशा अनेक उपक्रमातून होते.

ग्रामीण विज्ञान केंद्र केवळ विद्यार्थ्यांपुरते सिमीत राहू नये असे संस्थेस वाटते. शेतकरी, तरुण मंडळी, महिला मंडळे यांच्यासाठी यातून उपक्रम राबवण्याचा मानस संस्थेचा आहे. यासाठी सेंद्रीय शेती, दहा गुंठे प्रयोग, सोयाबीन लागवड अशी विविध प्रशिक्षण शिबिरे शेतकऱ्यांसाठी झाली. तरुणांसाठी कॉम्प्युटर प्रशिक्षण ग्रामीण पाणी नियोजनाबाबत काम करण्यास संस्था उत्सुक आहे. महिलांसाठी काही उद्योग शिबिरे ही येथे भरतात.

## पर्यावरण व्यवस्था व अंमलबजावणी :

पर्यावरणाचा विचार करताना सर्वात महत्वाचा विषय वृक्षारोपणाचा असतो. संस्थेनं आतापर्यंत ५० गांवात ७०,००० झाडं लावली व जगवली आहेत. केंद्रशासनाची जल–जीवन अमृत ही योजनाही संस्थेनं २१ गावात राबवली आहे. त्यानुसार ज्या शाळेकडं हातपंप आहेत अशा ठिकाणी पाणी पुनर्भरण करुन दाखवले. केशेगाव, फुलवाडी, होर्टी, धनगरवाडी व वागदरी या ५ गावात १३ शेततळी केली आहेत. शिवाय सहा गावात १९ वाड्या केल्या असून तेथे आंब्याची झाडे वाढत आहेत. ग्रामस्वच्छता अभियानात धनगरवाडी, फुलवाडी, देवसिंगा, खुदावाडी, दहिटणा या पांच गांवात ४०० ते ४५०



शोषखड्डे करण्यात आले. एकूण २४ गावात संस्थेने ७३० निर्धूर चुली बसवण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले. सांडपाण्याचा योग्य विनियोग करण्याच्या दृष्टीनं बचतगटाच्या महिलांना घरात परसबाग लावण्यासाठी प्रवृत्त केलं जातं. या परसबागातून भाज्या लावण्यात आल्या. शेवगा, पपई यांची रोपं पुरवण्यात आली. एकूण १२ गावात ही योजना राबवण्यात आली. गावोगावी शौचालयं बांधावीत असं प्रयत्न केले गेले. बचतगटाच्या महिलांना बोरनदीवाडी हे हागणदारीमुक्तगाव मुद्दाम दाखवायला नेलं. स्वयंसिध्दा प्रकल्प, पंचायत समिती, जिल्हा परिषद, कृषि विभाग यांच्या सहयोगातून संस्थेच्या प्रयत्नानं ९ गावात ९० शौचालयं बांधण्यात आली.

उस्मानाबाद जिल्ह्यातील भीषण दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन समविचारी स्वयंसेवी संस्थानी एकत्र येऊन तुळजापूरच्या टाटा समाज विज्ञान संस्था ग्रामीण परिसर येथे जिल्हाधिकारी आशिष शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांची एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीतच आपापल्या कार्यक्षेत्रात एक जलयात्रा काढून या प्रश्नावर जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. या यात्रेत नागरिकांना पाण्याचं नियोजन कसं करावं, पाण्याची पातळी वाढवण्याचे उपाय यावर मागदर्शन करण्यासाठी पोस्टर्स, बौध्दिक व्याख्यानं, पथनाट्य, दिंडी, गाणी आदी सर्व माध्यमांचा वापर करण्याचं ठरलं. ८ मार्च या महिला दिनाचं औचित्य साधून तुळजापूर

तालुक्यातील येवती येथून जलयात्रेचा प्रारंभ झाला. यात्रेत एक हजार वर्षापूर्वीचा जलकुंभ ठेवलेली पालखी अग्रभागी होती. पदयात्रेने दररोज एका गावात ही जलयात्रा जायची. हॅलोच्या कार्यक्षेत्रातील गावामधून हॅलोचे कार्यकर्ते, बचत गटाच्या महिला, किशोरी गट, युवक, भजनी मंडळ गावातून निघालेल्या वाजत गाजत जाणाऱ्या दिंडीत सामील होत असत. कार्यक्रमाचे आयोजन त्या त्या गांवच्या ग्रामपंचायतीकडेच दिलेलं असल्यानं सरपंच, उपसरपंच, सदस्य, शिक्षक आदी मोठ्या संख्येनं सहभागी होत. या जलयात्रेचा संदेश घराघरात पोहोचवण्याचं काम संस्थेचे सावधान कलापथक करत असे. त्यांच्या कार्यक्रमासोबतच ''पाणी'' हे नाटक सादर होई. दुष्काळ व पाणी हे गंभीर विषय मनोरंजनात्मक माध्यमातून जनतेसमोर आणल्यानं त्याला प्रतिसादही चांगलाच असे. हॅलोच्या कार्यक्षेत्रातील आठ गावातून ही जलयात्रा जाऊन तिचा समारोप १५ मार्च २००४ रोजी खुदावाडी येथे करण्यात आला. या सर्व प्रवासात ६ ते ७ हजार लोक सहभागी झाले होते, त्यातील निम्म्या महिला होत्या. पालखीला निरोप देण्याची पूर्वापार असलेली पध्दत म्हणून गावचे प्रतिष्ठित नागरिक व महिला, पालखी एका गावाहून दुसऱ्या गांवात पोहोचवण्यासाठी दुसऱ्या गावाच्या सीमेपर्यंत पायी चालत जात हे विशेष. या जलयात्रेत जेष्ठ विचारवंत श्री. पन्नालाल सुराणा, परिवर्तन संस्थेचे मारूती बनसोडे, बाळकृष्ण रेणके, विज्ञानवादी विचारवंत अरुण देशपांडे, टाटा इन्स्टिट्यूटचे श्री. दांडेकर, सौ. अंजली कुलकर्णी, अंधारे गुरुजी, सुरेश कंदले, डॉ.शशिकांत अहंकारी,



छायाताई दातार, कुंभार गुरुजी आदीनी मार्गदर्शन केले. ही जलयात्रा सुरु करण्यापूर्वी जेंव्हा गांवकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना पाणी प्रश्न समजावून सांगण्यात आला तेव्हा त्यांना हा प्रश्न कोणत्याही स्वयंसेवी संस्था वा शासनाचा नसून आपला, गांवकऱ्यांचा आहे हे प्रथमच लक्षात आले. त्यामुळेच ही यात्रा सर्वतोपरी यशस्वी करण्याचा त्यांनी उत्स्फूर्तपणे प्रयत्न केला होता.

## शाश्वत शेती :

आपल्या देशाने हरित क्रांतीचा पुरस्कार केला व अधिक उत्पादन मिळवण्यासाठी संकरित बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके यांचा शेतीत फार मोठ्या प्रमाणात वापर सुरु झाला. त्यामुळे प्रारंभीच्या काळात कांहीकाळ शेतीचे उत्पन्न वाढले पण नंतर मात्र पीक कमी पण खर्च जास्त असे सुरु झाले. आता तर खूप शेतजमीन नापीक बनत चालली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना कमी भांडवल व जास्त उत्पन्न देणारा, कायमस्वरुपी टिकणारा शाश्वत शेतीचा विचार करणे गरजेचे आहे. त्यासाठी आता शेतकऱ्यांना त्या संबधिची माहिती व ज्ञान देणं आवश्यक बनले आहे. हॅलोने यादृष्टीनं प्रयत्न करुन चार गांवात एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा घेतली. या प्रशिक्षणाचा फायदाही शेतकऱ्याना दिसू लागला आहे. सराटी गांवातील तानाजी हिंगमिरे यांनी गोमुत्र, शेण, लिंबाचा पाला एकत्र करुन त्याची तुरीवर फवारणी केली, त्याचा चांगला परिणाम दिसून आला. शहापूरला मिरचीच्या झाडाच्या बुंध्याला शेण आणि गूळ व गोमूत्र एकत्र करुन लावले गेले. दहिटण्याला मीना गायकवाड या बचत गटाच्या कार्यकर्तीनेही अशाच पध्दतीचा वापर केला. खुदावाडीत डॉ. खजुरे यांनी शेतातील रासायनिक खताचं प्रमाण कमी केलं शिवाय कायमस्वरुपी उत्पन्न देणारी शेती फळझाडं लावली.

याच विषयाच्या अनुषंगानं संस्थेनं राबवलेला वाडी प्रकल्पही खूप वेगळा आहे. ही मूळ संकल्पना आदिवासी भागातील जंगल जमिनीसाठी आहे. या योजनेनुसार एक एकर जमिनीत ४० आंब्याची झाडं लावायची. त्यासाठी मार्गदर्शन व रोपं संस्था देणार होती. फक्त रोपांची किंमत त्या शेतकऱ्यानं द्यावी हे अभिप्रेत होतं. हे सर्व करण्यासाठी बचतगटातून २४०० रु. कर्ज दिलं जाई, जे पहिल्या वर्षी बिनव्याजी होतं. त्यानंतर मात्र त्यावर व्याज आकारलं जाई.

जमीन जरी पुरुषाची असली तरी ती वाडी त्या घरातील बचतगट महिला सदस्याच्या नावानं ओळखली जाते. अशा एकूण २१ वाड्या कार्यक्षेत्रातील ११ गावात झाल्या आहेत. संस्थेनं कांही महिला व पुरुषाना वाडी प्रशिक्षण दिलं. या प्रकल्पात लावलेल्या आंब्याच्या झाडापासून एक दोन वर्षात उत्पन्न सुरु होऊ शकतं. याशिवाय गांडूळखत तयार करुन विक्री करण्याचाही प्रयत्न झाला पण त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

कृषी सप्तक कार्यक्रमात ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षित करुन शेतीत सहभागी करुन घेणं हा प्रमुख उद्देश आहे. त्यामध्ये महिलांना नवीन तंत्रज्ञानाचा परिचय करुन देणं, समान संधी उपलब्ध करुन देणं, सेंद्रिय शेतीचं महत्त्व पटवून पिकनिहाय उत्पादन वाढवणं, इत्यादीचाही समावेश आहे. त्यासाठी ''महिला गोष्टी'' चे उपक्रम घेण्यात येतात. ज्याला ८०० ते १००० महिला उपस्थित राहतात. या उपक्रमांतर्गत २० महिलांचा एक असे २० बचतगट स्थापन करण्यात आले. याचा उद्देश शेतीव्यवसायाला पूरक व्यवसाय सुरु करण्याचा होता. त्यानुसार फळप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन इत्यादीचे प्रशिक्षण त्या सभासदाना देण्यात आले. बचतगटाला प्रत्येकी २० हजार रु. प्रमाणे ४ लाख रु. चं कर्जवाटप करुन त्याला खेळतं भांडवल उपलब्ध करुन दिल्यानं त्यांनी त्या कर्जातून मिरची कांडप मशिन, रवा तयार करण्याचे मशिन, पापड–शेवया तयार करणारे मशिन, पिठाची गिरणी, मिरची कांडप मशिन आणून व्यवसाय सुरु केले. तसेच शेतीपालन, दुग्ध



व्यवसाय, सामुदायीक शेतीसारखे कार्यक्रमही सुरु केलेले आहेत. याशिवाय महिलांच्या वारणा, फलटण आदी ठिकाणी सहली नेण्यात आल्या व तेथे त्यांना महिलांनी सुरु केलेले विविध व्यवसाय प्रत्यक्ष पहाण्याची संधी उपलब्ध करुन दिली गेली.

## रोजगार हमी योजनेतील कार्य :

रोजगार हमी योजनेची कामे, कमी अधिक प्रमाणात सतत कुठेना कुठे सुरुच असतात. पण अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली की लोकांना रोजगार मिळत नाही. मग रोजगार हमीच्या कामाला वेग येतो. हॅलोच्या कार्यक्षेत्रात म्हणजे तुळजापूर, लोहारा व उमरगा या तालुक्यात गेल्या काही वर्षापासून सतत पाऊस कमी होत गेल्यानं दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. ठिकठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे सुरु झाली, गावकरी बायकापोरांसह या कामावर मजुरीसाठी जाऊ लागले. कडाक्याचे ऊन पण तेथे कसलीही सावली नसणं, पिण्याचं शुध्द पाणी उपलब्ध नसणे या कारणानं मजूर नेहमी आजारी पडू लागले. संस्थेच्या कार्यकर्त्या त्यांच्यावर उपचार करु लागल्या. रुग्णांची वाढती संख्या व कामाच्या ठिकाणी आरोग्य सुविधांचा अभाव लक्षात घेऊन संस्थेने रोजगार हमी योजनांच्या कामाच्या ठिकाणीच उपचार सुरु केले. हॅलोचा कार्यकर्ता या कामाशी जोडला गेल्यावर काम करताना या योजनेतील विसंगती, भ्रष्टाचार, नियमांचे सातत्याने होणारे उल्लंघन, मजुरांची पिळवणूक, शोषण या बाबी निदर्शनास आल्या. अनेक ठिकाणी लोकांनी तक्रारी करुन दखल घेण्याची संस्थेला विनंती केली. त्यामुळे हा मुद्दा संस्थेच्या लक्षात आला. बैठकीतील चर्चेनंतर संस्थेनं या विषयात लक्ष्य घालण्याचं ठरवलं. गंगाखेडचे श्रीनिवास कुलकर्णी यांनी लोहारा येथे रोजगार हमी योजनेचे मजुरांना प्रशिक्षण दिलं. या प्रशिक्षणासाठी अनेक गांवच्या रोजगार हमी योजनेच्या कामावर जाणारे मजूर, बचतगटाच्या महिला, भारत वैद्य कार्यकर्ते, मुकादम, संस्थेचे अन्य कार्यकर्ते असे ७८ जण हजर होते. सराटी, शहापूर, दहिटणा व खुदावाडीच्या प्रशिक्षण वर्गात रोजगार हमी योजनेचा कामाचा कायदा, मजूरांचे हक्क याविषयी तज्ञ तसेच शासकीय अधिकाऱ्यांचेही मार्गदर्शन झाले. या प्रत्येक गांवात १०० ते २०० मजूर उपस्थित असत. संस्थेने अनेक ठिकाणी कामावर औषधोपचार व उष्माघात होऊ नये म्हणून सावलीची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

केली. मजुरांच्या तक्रारीची तड लावण्याचेही प्रयत्न केले. प्रशिक्षण वर्गानंतर त्या त्या गांवात दक्षता समिती स्थापन करण्यात आली.

शहापूरला एक नाला बंडींगचे काम सुरु होते, त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला होता. त्याविरुध्द आवाज उठवणाऱ्याला कामावरचे मुकादम, अधिकारी दमदाटी करत होते त्यामुळे त्या कामावरच्या सुमारे १०० लोकांनी एकत्र येऊन एक तक्रार अर्जही दिला होता. पण कारवाई मात्र झाली नव्हती, म्हणून संस्थेने मजुरांच्या प्रशिक्षणासाठी चक्क कृषी अधिकाऱ्यांनाच मार्गदर्शक म्हणून बोलावले होते. तेथे मजुरांनी तहसिलदारासमोरच तक्रारीचा पाढा वाचल्याने संबंधित अधिकाऱ्याची पंचाईत झाली. तहसिलदारांनी त्या अधिकाऱ्याला सर्वासमक्ष तंबी दिली व अशा रितीनं मजुरांचा प्रश्न सुटला. त्यांना निम्मीच मजुरी प्रत्यक्षात मिळत होती ती नंतर पूर्ण मिळायला लागली. या प्रकरणात तक्रार करणाऱ्या संस्थेच्या दोन कार्यकर्त्यांना मुकादमाच्या माणसांनी धमक्या दिल्या होत्या, बांधून ठेवले होते ही बाबही सर्वासमक्ष उघडकीस आली. या प्रकरणात तहसिलदाराने खंबीर भूमिका घेतल्याने त्याचा सुखद परिणाम अन्य सर्व गावांवर झाला, व तेथील भ्रष्टाचार थांबला. नळदुर्ग शिवारातील काम दीड महिना बंदच होते व तेथील कामाची आधीच्या सहा महिन्यांची मजुरीची रक्कमही मजुरांना मिळालेली नव्हती. या कामावर जाणाऱ्या मजुरांचा एक मेळावा संस्थेनं घेतला. त्यात त्या कामावरचा, आधीच्या वर्षाचा ३५० क्विंटल गहू मजुरांना वाटप झालेला नव्हता व जवळपास ५० हजार रु. मजुरीही मिळालेली



नव्हती हेहि उघडकीस आले. सुमारे २५० मजुरांनी या सर्व तक्रारीचे एक लेखी निवेदन तहसिलदार, जिल्हाधिकारी यांना दिले, त्याची त्वरीत दखल घेतली गेली. तीनचार दिवसात काम तर सुरु झाले आणि मजुरांना गहू व थकित रक्कमही मिळाली. गुळहळ्ळी येथे पाझर तलावाचे एक काम सुरु होते, दोन महिने चालणाऱ्या या कामावर सावलीची कसलीही सोय नव्हती व पिण्याचे पाणीही नव्हते. संस्थेनं मजुरांना आसरा करुन दिला, दोन रांजण पिण्याचे पाणी साठवण्यासाठी दिले. त्यावर मुकादमानं दोन मजूर पाणी भरण्यासाठी दिले व हा प्रश्नही सुटला.

## जलस्वराज्य प्रकल्प :

'शुध्द पाणी स्वच्छ गाव' या गोष्टीमध्ये राज्यातली खेडी स्वयंपूर्ण व्हावीत हा मुख्य उद्देश ठेवून जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून महाराष्ट्र शासनानं 'जलस्वराज्य प्रकल्प' सुरू केला. मुळात या प्रकल्पाची संकल्पनाच अशी होती की, जास्तीत जास्त सहभाग हा ग्रामीण जनतेचा असावा व जनतेच्या सहभागातूनच या प्रकल्पाची अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रकल्पाचा आराखडा हा गावच्या वेशीतच ग्रामसभेतून तयार करावा व तयार केलेल्या आराखड्यात शासनानं आपला सहभाग नोंदवावा. अर्थात प्रकल्प राबवतांना लागणाऱ्या एकूण आर्थिक नियोजनात १०% सहभाग हा जनतेच्या 'लोकवाटा' माध्यमातून असावा आणि ९०% वाटा शासनाचा असेल. या एकूण रक्कमेतून व जनतेच्या सक्रिय सहभागातून त्या-त्या गावातील पाण्याचे स्त्रोत बळकट करणे व त्यातून प्रत्येक कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीला माणसी दररोज ४० लिटर पाण्याची पूर्तता होणे गरजेचे आहे.

यासाठी प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामसभेतून निवडण्यात आलेल्या तीन समित्या या प्रकल्पाचे मुख्य केंद्र आहेत. पहिल्यांदा ह्या तिनही समित्या सक्षम झाल्या तरच प्रकल्प प्रभावीपणे राबविले जाईल या हेतूनं समित्याचे प्रशिक्षण व बळकटीकरण यासाठी सुध्दा खर्चाची तरतूद या प्रकल्पात केली जाते. यात त्या समित्यांच्या सहली, प्रशिक्षणे, मेळावे, स्पर्धा असे विविध कार्यक्रम हाती घेतले जातात. ''ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती'' या समिती अंतर्गत या प्रकल्पाची अंमलबजावणी होते. तर या प्रकल्पात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला सक्षमीकरण समिती कार्यरत

असते, या दोन्ही समिती अंतर्गत खर्चित रकमेला मंजूरी देणे व सर्व तपासणी करणे हे काम लेखापरिक्षण समितीचे असते. अशा प्रकारच्या प्रकल्प अंमलबजावणीत सहाय्य करण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी संस्थेने उस्मानाबाद जिल्ह्यातील आठ गावांच्या कामात सहभाग नोंदवला. पण यातून असं दिसून आलं की, 'जलस्वराज्य प्रकल्पा' च्या उद्दिष्टाप्रति गावपातळीवरुन व शासनपातळीवरुन प्रभावीपणे काम होत नाही.

## जीवन व आरोग्य विमा योजना :

ग्रामीण भागात 'उपचारापेक्षा मृत्यु स्वस्त' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. मुळातच पावसाच्या अनियमिततेमुळे कायमच दुष्काळाची परिस्थिती असणाऱ्या उस्मानाबाद जिल्ह्यात रोजगाराच्या साधनांची कमतरता, रोजगाराच्या संधीचा अभाव असतो. उपजिविकेच्या प्रश्नामुळे जगण्यासाठीच्या धडपडीत आरोग्यासाठी खर्च करण्याची ऐपतच नाही, त्यामुळे उपाचारापेक्षा मरण पत्करणे नाईलाजाने स्विकारावे लागते हे वास्तव आहे. शासनाच्या आरोग्य सेवेतील अनेक त्रुटीमुळे तेथूनही पूर्णपणे उपचार होण्याची शक्यता नाही.

चिकनगुनीयाच्या साथीमध्ये आमच्या सर्वेक्षणानुसार प्रत्येक कुटुंबाचा आरोग्याचा खर्च किमान २ ते ३ हजार एवढा होता. प्रत्येक गावातील प्रत्येक घरातून हिच परिस्थिती होती. अशा परिस्थितीत आरोग्य विमा योजना हाच या भागातील सर्वसामान्य लोकांसाठी जगण्याच्या धडपडीत मोठा आधार आहे.

महिलांच्या आरोग्याकडे कुटुंबातून व बऱ्याच वेळा स्वत: महिलांकडून दुर्लक्ष होत असते. केवळ पैशाच्या अभावाने महिलाना अनेक शारीरिक व्याधींचा सामना करावा लागतो. त्यामुळं त्यांना त्यासाठी कांही अर्थसहाय्य मिळावं अशी मागणी बचत गटांनी संस्थेकडं केली होती. संस्थेनं त्यादृष्टीनं सकारात्मक प्रतिसाद दिला. आरोग्याच्या खर्चाला पर्यायी व्यवस्था या संकल्पनेतून आरोग्याचा विमा सुरु करण्याचा निर्णय घेऊन विमा कंपन्याशी संपर्क साधला व त्यांची मंजुरीही मिळवली. ८ मार्च २००४ पासून ही योजना कार्यान्वित झाली.

हॅलो मेडिकल फाऊंडेशन, युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी व भारतीय जीवन बीमा निगम यांनी एकत्रितपणे संजीवनी जीवन व कुटुंब आरोग्य विमा योजनेची आखणी केली. त्यामध्ये बचत गटाच्या महिला सभासदाला वर्षाला ३७५ रु. हप्ता द्यावा लागतो. विमा लाभधारकाला व तिच्या पती व दोन

मुलांना आरोग्याच्या खर्चापोटी ५००० रु. पर्यंतचा लाभ मिळतो. ज्यायोगे चार जणांचे कुटुंब आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षीत होते. विशेष म्हणजे या योजनेतून बाळंतपणाच्या खर्चासाठीसुध्दा १५०० रु. देण्याची सोय केलेली आहे. भारत जीवन बिमा निगमच्या जनश्री विमा योजनेतून पुढील लाभ मिळतात. अपघात किंवा नैसर्गिक मृत्यू यासाठी वारसाला ५०,००० रु. व २०,००० रु. विमा कंपनीकडून विम्याची रक्कम मिळते. याच अंतर्गत शिक्षा सहयोग योजनेतून विमा पॉलिसी धारकांच्या अपत्यांना शिक्षणासाठी वर्षाला १,२०० रु. मिळतात. विशेष म्हणजे ती रक्कम मिळते म्हणून बऱ्याच मुलींना पालकांनी शाळेत घातले आहे व त्या मुलींना शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे. एकूण ६७ गांवात ही योजना राबवण्यात आली आहे. भारतीय जीवन बिमा निगमच्या योजनेत २२६५ पॉलिसीधारकापैकी जनश्री विमा योजनेत एका नैसर्गिक मृत्यू झालेल्या नातेवाईकास २०,००० रु. रक्कम वाटप करण्यात आली. शिवाय युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या २८९१ पॉलिसीधारकापैकी २४९ लाभदायक होते व त्यांना एकूण ४,६७,९९४ रु. वाटप करण्यात आले. याचअंतर्गत ९ वी ते १२ वीच्या ९०० मुला-मुलींना १०,८०,००० रु. शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. याशिवाय संस्थेच्या जानकी रुग्णालयामार्फत विमाधारकांच्या संपूर्ण कुटुंबाची वर्षातून एकदा मोफत तपासणी करुन त्यांना गरजेनुसार मोफत उपचारही केला जातो व आरोग्य तपासण्यावर ५० टक्के सवलतही दिली जाते.

महिलांचाही विमा असू शकतो यावर आधी तर ग्रामीण भागातील महिलांचाच मुळात विश्वास बसत नाही, कारण तशी मानसिकताच असते. विमा काढणे म्हणजे मरण मागून घेणे असा एक विचित्र गैरसमज त्या मागे असतो. पण ही योजना हॅलोने बचतगटात राबवली व त्यांना समजावून सांगितली एवढेच नव्हे तर कांही गांवात क्लेमचे पैसेही मिळाले, त्यानंतर मात्र त्या गांवच्या महिलांना या विम्याच्या योजनेचं महत्व पटायला लागलं.

## दहा गुंठे प्रकल्प :

उस्मानाबाद जिल्हा हा पावसाच्या अनियमिततेमुळे कायमचा अवर्षण ग्रस्त आहे. शेतकऱ्यांच्या उपलब्ध जमीनी आणि त्यासाठी उपलब्ध असलेले पाणी याचा मेळच नाही. जेथे पाणी उपलब्ध आहे तेथे ते कसे वापरावे याची माहिती व भान नाही. त्यामुळे या भागातील शेतकरी कायमच अडचणीत आहे.

उपलब्ध पाण्याचा वापर करुन कमीत कमी जमिनीत उत्पन्न वाढविण्यासाठी महाराष्ट्रात प्रथम कै. श्री. अ. दाभोळकर यांनी प्रयोग परिवाराच्या माध्यमातून दहा गुंठे प्रकल्पाची मांडणी व उभारणी केली. कार्यक्षेत्रातील व परिसरातील शेतकऱ्यांना याची माहिती व्हावी त्यातून त्यांचा आर्थिकस्तर वाढावा या उद्देशानं संस्थेनं अणदूर येथे दहा गुंठा प्रकल्पाची उभारणी केली.

कमी पाणी आणि थोडी जमीन यांचा वापर करुन कमी खर्चात जास्त उत्पन्न वाढणे, सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार करणं, महिलांचा स्वत:च्या शेतीवरचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी हा दहा गुंठे प्रकल्प राबवण्याचे संस्थेने ठरवलं. कार्यक्षेत्रातील व बचतगट तसेच शेतामध्ये मोलमजुरी करणाऱ्या महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सन २००३ मध्ये या प्रयोगाची सुरुवात करण्यात आली. त्यासाठी संस्थेची १० गुंठे जमीन व रोज दोन ते अडीच हजार लिटर पाण्याची व्यवस्था केली गेली. संस्थेने प्रयोगासाठी निवडलेली जमीन ही खडकाळ मध्यम व हलक्या प्रतीची होती. त्यामुळे त्या जमिनीला सुपिक बनवण्यासाठी मसाला माती तयार करुन ती पसरण्यात आली. ही मसाला माती तयार करण्यासाठी परिसरातील काडीकचरा, पाला पाचोळा वापरण्यात आल्यानं आपोआपच परिसर ही स्वच्छ झाला. प्रयोगासाठी निवडलेल्या जमिनीचे एक गुंठ्याप्रमाणं १० प्लॉट तयार करण्यात आले. प्रथम त्या संपूर्ण प्लॉटला संरक्षण म्हणून तुराट्याचा वापर करुन सुके कुंपण तयार करण्यात आले. कायम स्वरुपी कुंपण व्हावे म्हणून ओल्या कुंपणाची रचना केली व त्यामध्ये काटेरी व



जनावराना चारा मिळणाऱ्या व खत तयार करण्यासाठी लागणारा पालापाचोळा लागणाऱ्या कांही वनस्पतींचा वापर करण्यात आला.

या दहा गुंठे शेतीवर पांच माणसांचे एक कुटुंब स्वत:चा उदरनिर्वाह करु शकेल असे अभिप्रेत असल्यानं त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन तेथे लागवड करण्यात आली. त्यानुसार एक प्लॉट भाजीपाल्याचा होता. ज्यातून त्यांना स्वत:ला सकस भाजी मिळू शकेल व राहिलेला भाजीपाला विकून त्यातून काही आर्थिक उत्पन्नही मिळू शकेल. दुसऱ्या प्लॉटमध्ये तेलबियांचे उत्पन्न घेतले. एका प्लॉटमध्ये गहू व एका प्लॉटमध्ये ज्वारी, एकात वेगवेगळी फळझाडे लावून फळबागही तयार झाली. सौरउर्जेचा जास्तीजास्त वापर करुन उत्पन्न काढता यावे म्हणून एका गुंठ्यात सूर्यमंडळाची रचना केली तसेच परिसरातील सर्व शेतकऱ्यांना कमी खर्चात उत्पन्न घेता यावे म्हणून एक डोळा पध्दतीनं ऊसाची रोपं तयार करुन ती लागवड केली व उत्पन्न घेतले. एका गुंठ्यात हळदीचे पीक तर राहिलेल्या एका गुंठ्यात गांडूळ खत व मसालामाती करण्यासाठी वापर करण्यात आला.

आपल्या देशात प्रामुख्यानं बैल व यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानं शेती केली जाते. त्याऐवजी या दोन्हींचा वापर न करता केवळ माणसांच्या अंगमेहनतीवर उत्पन्न काढता येते हे या प्रयोगानं सिध्द केलं आहे. या प्रयोगात एका गुंठ्यातून ५० ते ६० किलो ज्वारी काढता येते हे जसे सिध्द केले तसेच एका गुंठ्यातून २० पोत्यापेक्षा जास्त ज्वारी काढता येते हे देखील दाखवून दिले गेले. एका गुंठ्यातून निघालेल्या ऊसाचं गुऱ्हाळ करुन १० किलोचे १५ ढेपी गूळ तयार करण्यात आला. पपईच्या झाडांना प्रती झाड २ किलो वजनाचं सरासरी ८० ते ९० फळे निघाली. अशा रितीनं संस्थेनं ३ वर्षांच्या प्रात्यक्षिकानंतर एका कुटुंबाला दहा गुंठे जमीन व दोन हजार लिटर रोजचे पाणी यातून इतर मजुरापेक्षा जास्त उत्पन्न काढता येते हे सिध्द करुन दाखवले. इतरांच्या जमिनीवर दिवसरात्र राबण्यापेक्षा कमी श्रमात स्वत:च्या जमिनीवर चांगले उत्पन्न मिळू शकते हेहि या निमित्ताने सिध्द झाले. परिसरातील महिलांना खास इथे आणून हे प्रात्यक्षिक दाखवलं गेलं. शिवाय विविध प्रशिक्षण शिबिरात ही त्याची माहिती सांगण्यात आली. त्याचा परिणाम होऊन अनेक महिलांनी त्यांच्या शेतात हे प्रयोग केले. इटकळच्या कांही महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून सेंद्रिय पध्दतीनं शेती केली, लोहारा तालुक्यातील कांही महिलांनी फळझाडांच्या वाड्या तयार केल्या, संस्थेचा हा प्रयोग पाहण्यासाठी अनेक पुरुष व स्त्रियांनी भेटी दिल्या व संस्थेच्या कामाचे कौतुक केले.

## गाव सहभागी सूक्ष्म नियोजन :

शासनाने ग्रामीण भागात तळागाळापर्यंत विकासाची गंगा नेण्यासाठी व देशातील जनतेला सजग करण्यासाठी ग्रामपातळीवर अनेक उपक्रम राबवले, योजना आखल्या. पण त्याचा फायदा मात्र अपेक्षित प्रमाणात दिसून आला नाही. त्यामुळे लोकसहभाग, अशासकीय सामाजिक संस्था व शासकीय यंत्रणेची सांगड घालून ''युनिसेफ'' च्या सहकार्यानं गाव सहभागी सूक्ष्म नियोजन हा नवा प्रकल्प राबवण्याचं ठरविलं. महाराष्ट्रात सर्वप्रथम नंदुरबार, चंद्रपूर, लातूर व अमरावती या चार जिल्ह्यात हा प्रयोग सुरु झाला व त्यानंतर १० जिल्ह्यात तो पूर्णही झाला. प्रारंभी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात शिक्षण हा मुख्य गाभा होता तो नंतर इतर जिल्ह्यात काम करताना आरोग्य, आहार, शिक्षण, पाणी व स्वच्छता इत्यादी विषयाचीही व्याप्ती वाढवण्यात आली.

उस्मानाबाद जिल्ह्यात हॅलोच्या माध्यमातून लोहारा व तुळजापूर तालुक्यातील ४१ गावात हा प्रकल्प राबवण्यात आला, त्यानुसार ४७ हजार लोकसंख्येची व ५३५३ कुटुंबांची माहिती संकलित झाली आहे. या योजनेचे मूळ जनक व प्रत्यक्षात प्रकल्प राबवणारे युनिसेफचे महाराष्ट्रातील प्रमुख श्री. गोपीनाथ मेनन यांच्या मते सूक्ष्म नियोजनाची जी प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यानुसार लोकांना गावाच्या विकासासाठी प्रवृत्त करण्यासाठी प्रथम पांच दिवसांचे एक प्रशिक्षण द्यायचे, ज्याच्यामुळे त्यांना त्यांच्या गांवाची आरोग्य, आहार, शिक्षण, पाणी व स्वच्छता या प्रश्नाशी निगडीत नेमकी सद्यस्थिती काय आहे याचे मूल्यमापन करता येईल. त्यानंतर अशी परिस्थिती कां निर्माण झाली याचा विचार करु शकतील व ती सुधारण्यासाठी काय कृती आराखडा आखावा लागेल याचा निर्णय स्वत:च घेऊ शकतील. या प्रश्नांच्या सोबतच गावाचे इतर प्रश्न उदा. अकाली आलेले मातृत्व, लिंगभेद असमानता, स्त्री पुरुषांचे प्रमाण, शिक्षणाचा अभाव, आदीमुळें समाजाच्या प्रगतीत होत असलेले अडसर याची त्यांना जाणीव होईल व त्यावर मात करण्याचा मार्ग ते शोधतील. समाजस्वास्थ सुधारण्यासाठी गांवात शोषखड्डे, गांडूळ खत निर्मिती, स्वच्छतागृहांचे बांधकाम आदींचा ते विचार करतील जेणेकरुन त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल. यासाठी समाजातील महिला, तरुण व मुलांचे गट स्थापन करुन त्याचा वापर विकासात्मक उपक्रम राबवण्यासाठी केला जाऊ शकेल.

युनिसेफचा हा कार्यक्रम आपल्या कार्यक्षेत्रात राबवतांना त्यात संस्थेच्या दृष्टीकोनातून कांही उद्दिष्टांचा समावेश केला आहे. त्यानुसार

कार्यकर्त्यांची क्षमता वाढवणे, त्यांच्या कामाला दिशा देणे, अधिकाधिक लोकापर्यंत कसे पोहोचता येईल याची कला आत्मसात करणे, इतर सहकारी संस्था, मित्र संस्था यांच्याशी संपर्क वाढवणे, या माध्यमाचा वापर करुन संस्थेचे काम अधिकाधिक लोकापर्यंत पोहोचवणे, कार्यक्षेत्रातील युवक युवतीना निवडून, प्रशिक्षण देऊन त्यांना कामाची संधी देतानाच त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आदी उद्दिष्टांचाही त्यात समावेश केला. या प्रक्रियेत सामाजिक संस्थेला सहभागी करुन घेतल्यामुळे जनतेची पिळवणूक थांबली आणि जनतेला त्यांचा हक्क व अधिकाराची जाणीव झाली. त्यांच्या नेमक्या समस्या व गरजा समजल्या. त्यामुळे नियोजन खऱ्या अर्थानं जनतेपासून म्हणजे तळापासून सुरु झालं व लोकमताला महत्त्व प्राप्त झालं.

सूक्ष्म नियोजन कार्यक्रमाचं वैशिष्ट्य असं की, जो मुद्दा समाजाला समजावून सांगायचा आहे वा समाजासमोर मांडायचा आहे त्याचे सादरीकरण एखाद्या खेळाच्या स्वरुपात केले जाते. त्यामुळे उपस्थितांचा त्यात सक्रीय सहभाग असतो व त्यात रुक्षपणा न राहता हसतखेळत प्रश्न समोर येतो त्यावर वेगळेच विचार करु लागतात. शासनाच्या विविध योजना जनतेसाठी राबवल्या जातात पण खरेच या योजनांची जनतेला गरज आहे कां ? हे विचारात घेतले जात नाही. गावात मतपरिवर्तन झाले तरच गांव बदलेल म्हणजे पर्यायाने समाज बदलेल व विकासाचे अपेक्षित ध्येय आपण गाठू शकतो. केवळ सुधारणा म्हणजे विकास नसून संकटातून, समस्यातून मुक्तता म्हणजेच विकास होय.

मानवविकास मिशन अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील १५० गावामधून लोकसहभागी सूक्ष्म नियोजनाची प्रक्रिया संस्थेचे कार्यकर्ते राबवित आहेत.

## जानकी रुग्णालय :

हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या कामाचा पसारा वाढला. भारत वैद्यक कार्यकर्त्यांना संदर्भ रुग्णालयाची गरज वाटू लागली, म्हणून भारत वैद्यक कार्यकर्त्यांकडून रुग्णालयाची मागणी वाढू लागली. आरोग्य विम्याचे काम संस्थेने सुरु केले नि म्हणून 'कॅशलेस रुग्णालयाची' संकल्पना ही मुळ धरु लागली. 'उपचारापेक्षा मृत्यू स्वस्त' या भयावह वास्तवाला पर्याय म्हणून आरोग्य विम्या मध्ये काम सुरु झाले. लोकांना माफक दरात कशा प्रकारे सुविधा देता येतील या विषयावर विचार, मंथन, चर्चा होऊ लागल्या. डॉ. शुभांगी अहंकारीची सर्व

खाजगी प्रॅक्टीस व सर्व साधन सामुग्री संस्थेच्या जानकी रुग्णालयात विलीन करण्यात आली.

या रुग्णालयाची खालील वैशिष्ट्ये आहेत.

* हे रुग्णालय उपचारा (Curative) बरोबरच प्रतिबंधात्मक (Preventive) काम कसे करेल.
* आरोग्या संदर्भातील विविध पर्याय होमिओपॅथी, आयुर्वेद, अॅक्यूपंक्चर ई. चा अॅलोपॅथी बरोबरच सक्षमपणे वापर करुन लोकांना कसा फायदा होईल याचे नियोजन रुग्णालय करेल.
* सर्व भारत वैद्यक कार्यकर्त्या आळीपाळीने येथे रुग्णालयाचा कर्मचारी वर्ग म्हणून काम करतील व त्याच काळात त्यांच्या गावातल्या रुग्णांनाही येण्यास सांगतील.
* गावातल्या वेगवेगळ्या आजारांचा विचार करता काही शिबीरे (Camps) ठेवून, तज्ञ डॉक्टरांना बोलावून रुग्णांना फायदा करुन देता येईल.
* विविध आजारांवरील तज्ञ मंडळींना बोलावून रुग्णाबरोबरच बातचीत करुन लोकशिक्षण व आरोग्य प्रबोधन घडवून आणण्यात रुग्णालय आघाडीवर असेल.
* अॅनिमिया, कुपोषण, गरोदरमाता इ. वर विशेष लक्ष देऊन, संशोधन करुन पुढच्या सक्षम पिढीसाठी रुग्णालय विशेष प्रयत्नात राहील.





* राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वरील हे रुग्णालय 'ट्रोमासेंटर' म्हणून काही अपघातातील रुग्णांना त्वरीत प्रथमोपचारासाठी कसे उपयोगात आणता येईल याची आखणी चालू आहे.

१९ ऑगस्ट २००७ ला एका मोठ्या सर्वरोग निदान शिबिराने रुग्णालयाची सुरवात झाली. १७०० रुग्ण यात तपासणी व उपचारासाठी सहभागी झाले होते. विविध विषयातील तज्ञ मंडळींना त्या दिवशी पाचारण केले होते. सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, तुळजापूर व औरंगाबाद या ठिकाणच्या ५०-६० तज्ञ डॉक्टरांचा मोफत सल्ला त्या दिवशी रुग्णांना लाभला. माफक दरात रक्त, लघवी चाचण्या झाल्या. केवळ शंभर रुपयात त्या दिवशी सोनोग्राफी करण्यात आली. रुग्णांवर उपचारही माफक दरात औषधे पुरवून करण्यात आला. पॅपस्मिअर व कॅन्सर बाबत तपासणी व निदानही करण्यात आले.

१ सप्टेंबर २००७ पासून रुग्णालय नियमित सुरु झाले आहे. डॉ. शुभांगी अहंकारी व डॉ. अश्विनी कुलकर्णी पूर्ण वेळ उपलब्ध असतात. डॉ. अशोक अहंकारी (सर्जन) सोमवार, मंगळवार व बुधवारी येतात तसेच अन्य दिवशी गरजेनुरुप डॉक्टर येतात. ऑपरेशन थिएटर नियमीत सुरु असून केवळ माफक दरात सिझेरियन करण्यात येत आहेत. बाळंतपणे नियमितपणे करण्यास सुरुवात झालेली आहे. सुसज्ज प्रयोग शाळेत सर्व तपासण्या करण्यात येत असून गरोदर महिलांच्या रक्त व लघवीच्या सर्व तपासण्या माफक दरात करण्यात येत आहेत.

भौतिक उपचार फिजिओथेरॅपी चा विभाग ही सुरु करण्यात आला आहे. यात जुनी दुखणी, सांध्यांचे आजार, मुरगळणे ई. साठी शेक, अल्ट्रासोनिक व एक्सरे ची सुविधा उपलब्ध आहे. सोनोग्राफीची सुविधाही अत्यंत माफक दरात देण्यात येते.

कार्यक्षेत्रातील गावांतून गरोदर महिलांची तपासणी शिबीरे घेतली जातात, त्यात गावातच रक्त लघवी तपासण्या करण्यात येतात. किशोरी मुलींच्या हिमोग्लोबीन तपासण्या झाल्या. त्यांना आहाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. योग, आयुर्वेद, आहारासाठी रुग्णांना आता गावांमधून, शाळां मधून प्रात्यक्षिके संस्था घेणार आहे.

महिन्यातून एकदा विविध तज्ञ डॉक्टर मंडळी या ठिकाणी येऊन त्यांची सेवा देण्यास उत्सुक आहेत व रुग्णांना त्याचा फायदा होण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. विविध तज्ञ मंडळीच्या लोकांसमोर मुलाखती घेऊन लोकशिक्षण अधिक प्रभावीपणे घडेल असे संस्थेला वाटते.

जानकी रुग्णालयाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र फाऊंडेशन, श्री सिध्दी विनायक गणपती न्यास, बचत गटातील महिला, काही दानशूर व्यक्तींनी अर्थसहाय्य दिले आहे. इंडियन एक्सप्रेस सिटीझन्स रिलीफ फंडने बारा लाख रुपयाची यंत्रसामुग्री दिली आहे. आ. मधुकरराव चव्हाण ट्रस्टने अतिदक्षता विभागासाठी एक लाख रुपयाचा निधी दिला आहे.

## गरोदर माता व नवजात अर्भक यांच्या आरोग्यासाठी शुअर स्टार्ट प्रकल्प सोलापूर :

विकसित देशात गरोदरपण व बाळंतपणातील गुंतागुतीने दर १,००,००० बाळंतपणापाठीमागे १०० पेक्षा कमी स्त्रिया मृत्यूमुखी पडतात. भारतात मात्र अगदी २००५ सालीदेखील या कारणाने दरवर्षी जवळ जवळ ३०० स्त्रिया मृत्यूमुखी पडतात. १५ ते ४९ या वयोगटातील विवाहित स्त्रियांपैकी निम्म्यापेक्षा थोड्या जास्तच स्त्रिया ॲनिमिक आहेत. ६ ते ३५ महिन्यांच्या बालकांमध्ये एक तृतियांश बालके कमी वजनाची असतात. ॲनिमियाचे प्रमाण जवळ जवळ ८० टक्के आहे.

गरोदर माता व बालकांची काळजी कुटुंबाने, समाजातील संस्थांनी आणि राज्य व केंद्र शासनाने घेणे आवश्यक आहे. या दिशेने आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील प्रयत्न होत आहेत. भारत सरकारने २०१० सालापर्यत माता



मृत्यूचे प्रमाण १०० पर्यत खाली आणायचे ठरविले आहे. सरकारी पातळीवर अनेक योजना राबवल्या जात आहेत.

साहजिकच गेली २५ वर्षे आरोग्य या विषयावर कार्यरत असणाऱ्या हॅलो (Health and Auto Leaming Organisation) मेडिकल फाउंडेशन या अशासकीय संस्थेला हा विषय जिव्हाळ्याचा वाटत होता. त्याचवेळी उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील शहरी विभागात या प्रश्नावर काम करायचे PATH (Programme for Appropriate Technology in Health) या आंतरराष्ट्रीय संस्थेने ठरविले. हॅलो मेडिकल फाउंडेशनने पाथच्या मदतीने सोलापूर 'शुअर स्टार्ट' प्रकल्प फेब्रुवारी २००७ पासून सुरु केला आहे. या प्रकल्पात हॅलो मेडिकल फाउंडेशन व सहयोगी सदस्य मंडळाचा सहभाग आहे.

सोलापूरची लोकसंख्या २००१ सालच्या जनगणनेनुसार ८.७ लाख आहे. त्यांतील २१ टक्के लोक वस्त्यांमधून राहतात. २००७ सालापर्यत यात वाढच झाली असणार. शहरात २५६ वस्त्या आहेत. त्यापैकी १५० अधिकृत वस्त्यातून ६५ वस्त्यांची प्रकल्पासाठी निवड केली आहे. प्रकल्पाचा कालावधी चार वर्षाचा आहे. जवळजवळ १.५ ते २ लाख गरीब जनतेशी संपर्क करत ५० ते ६० हजार स्त्रियांशी थेट संवाद करायचा आहे. साधारण दरवर्षी ५ ते ६ हजार गरोदर महिलांना याचा प्रत्यक्ष फायदा होणार आहे.

गरोदर महिलांपर्यंत पोहचण्यासाठी आणि आरोग्याच्या कामात सातत्य राखण्यासाठी प्रकल्पाने वस्तीमध्ये असणाऱ्या बचतगटांची मदत घेतली.

प्रकल्पाच्या कार्यकर्त्या गरोदर महिला व बालक यांच्या आरोग्याबद्दल संपूर्ण आणि स्पष्ट माहिती बचतगटांना देतात. ही माहिती प्रकल्पाने स्विकारलेल्या सूचना त्यावर आधारित असते. या सूचनांमध्ये पहिल्या तीन महिन्यात दवाखान्यात नाव नोंदणी झाली पाहिजे. संपूर्ण नऊ महिन्यात किमान तीन वेळा दवाखान्यात तपासणी करायला हवी. गरोदर महिला लोहगोळ्या घेतात का? धर्नुवाताची दोन इंजेक्शने घेतली का? बाळाला चीक दूध पाजले का? आदि मुलभूत गोष्टींची माहिती, त्या मागची कारणे सांगून, समाजावून दिली जातात.

या महितीमुळे बचतगटाच्या महिला गरोदर महिलांची नीट काळजी घेतात. त्यासाठी बचतगट गरोदर महिलांना दत्तक घेते. हे काम नुकतेच सुरु झाले असून एक आठवण या कामाची सांगावी अशी आहे. बचतगटाच्या महिलांना अतिजोखमीची माता कशी ओळखायची हे शिकवले होते. त्यानुसार आवसे वस्तीतील महिलांनी त्यांच्या वस्तीतील महिलेच्या घोटाच्या वरच्या बाजुला सूज पाहिली तेव्हा त्या तिला ताबडतोब दवाखान्यात घेवून गेल्या. नंतर या महिलांनी व प्रकल्पातील समन्वयकांनी डॉक्टरांना फोन केला. त्यामुळे त्या महिलेला ताबडतोब संदर्भसेवा पुरविली आणि तिच्या जिवावरील धोका टळला.

बचतगटाच्या काही महिला व वस्तीतील महिला, स्वयंसेवक म्हणून वस्तीत काम करण्यास तयार झाल्या. त्यांना माता व बाल आरोग्य, बचत गट, लिंगभाव, संवाद कौशल्ये या विषयांवर दोन दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले. त्यावेळी या महिलांनी प्रशिक्षणास चांगला प्रतिसाद दिला.

त्यांना माता व बाल आरोग्यावरील स्लाईड शो दाखवतांना संपूर्ण शरीराची ओळख करुन दिली जाते. त्यातील कांहीजणी तोंडाला पदर लावून गंभीर होवून बघत होत्या. लिंगभावाबद्दल माहिती दिली तेव्हा तर एकजणीने लिहले, 'मी ही एक स्वप्न पाहिले होते, आकाशात उंच उडण्याचे पण मनात अनेक शंका उचंबळत होत्या. पक्षाला पंख आहेत म्हणून तो आकाशात उंच उडू शकतो पण मी ? मला आज कळले मुला–मुलींमध्ये असणाऱ्या क्षमता लिंगामुळे वेगळ्या नाहीत, म्हणजे मी ही आकाशात झेप घेवू शकते. समाजासाठी काही करु शकते'.

## अन्य संस्थांसोबत कांही उपक्रम :

पुण्यातील सोस्वा संस्था प्रजननात्मक आरोग्य व बाल आरोग्य या विषयावर काम करते. त्यांनी या अनुषंगाने एक प्रकल्प इ.स. १९९९ ते २००३ असा तीन वर्षासाठी हॅलो संस्थेत राबवला. त्या अंतर्गत माता व

बालकांची आरोग्य तपासणी, आरोग्य शिबिरे घेणे, जनजागृती करणे, आरोग्य विषयक नोंदणी करणे, माता आणि बालमृत्यू थांबवणे, कुपोषण थांबवणे, किशोरींचे प्रशिक्षण आयोजित करणे ही सर्व कामे १० गावांत करण्यात आली. पुण्याच्याच आरती (Appropriate Rural Technological Institute) या संस्थेनं निर्धूर चुलीचे तंत्रज्ञान कसे वापरायचे याचा प्रकल्प संस्थेमार्फत या गांवात राबवला. त्यानुसार महिलांना निर्धूर चुली कशा करायच्या, सराई कुकर व कांडी कोळसा कसा करायचा व कसा वापरायचा याचे प्रशिक्षण संस्था काम करत असलेल्या सर्व गावात दिले. संस्थेने त्यानुसार सर्व कार्यक्षेत्रात १२०० निर्धुर चुली बसवल्या होत्या त्यापैकी ३८४ चुली सध्या सुरु आहेत.

गरोदर मातेपासून बाळाला होणाऱ्या एच.आय.व्ही.ची. लागण थांबवणे (Prevention of mother to child transmission of HIV Aids) या नांवाचा एक प्रकल्प पुण्याची 'प्रयास' नावाची संस्था राबवते. त्यांच्या पाहणीनुसार प्रत्येक १०० गरोदर मातामध्ये एक एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह माता असते. यासाठी सर्वच गरोदर मातांची तपासणी करणं गरजेचे ठरते. या तपासणीत रक्तगट, हिमोग्लोबीनचे प्रमाण, काविळ, लिंग सांसर्गिक आजार या सोबतच एच.आय.व्ही. तपासणीही केली जाते. या प्रकल्पांतर्गत संस्थेच्या कार्यकर्त्यांनी व परिचारिकांनी २९३७ महिलांचे तपासणीपूर्व समुपदेशन केले. त्यापैकी २५६० महिलांची रक्त तपासणी करण्यात आली. त्यात २१ महिला एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह निघाल्या. त्यांच्यावर उपचार करण्यात आला. गरोदरपणात तपासणी झाली. त्यांना एच.आय.व्ही. लागण कशामुळे होते हे समजावून सांगण्यात आले. त्यासाठी त्यांना ''आई होताना'', ''तुम्हाला हे माहित आहे का?'', ''सुरक्षित मातृत्व व सुखरुप बाळंतपण'', तसेच पॉझिटिव्ह असणाऱ्या महिलांना ''तरीसुध्दा आई होताना'' या पुस्तिकाच्या माध्यमातून जागरुकता वाढली व निष्कारण जी भीती होती ती कमी झाली.

## शैक्षणिक समन्वय :

हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या विविध उपक्रमाबरोबरच अनेक शैक्षणिक संस्थाबरोबर समन्वय प्रस्थापित झाला आहे. टाटा समाजविज्ञान संस्था मुंबई व तुळजापूर ग्रामीण परिसर, वालचंद समाजशास्त्र महाविद्यालय, सोलापूर, भारती विद्यापीठ समाजशास्त्र महाविद्यालय, सोलापूर येथील विद्यार्थी त्यांच्या अभ्यासासाठी संस्थेच्या गावामधून येतात. त्यांना विषय दिले जातात. त्यावरती

त्यांचे सादरीकरण होते. वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या इंटर्नशीपसाठी हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या केंद्रास विद्यापीठाने मान्यता दिली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून मॉंट्रियल विद्यापीठ कॅनडा, वारविक विद्यापीठ इंग्लंड, जर्मनी येथील विद्यार्थी एक–एक महिन्याच्या अभ्यासासाठी संस्थेत येऊन गेले.

- ताजिकिस्थानच्या आरोग्यमंत्र्यांनी त्यांच्या टीमसोबत दि. २५/१०/०५ रोजी युनिसेफ अंतर्गत नवजात शिशू अर्भकावरील एकात्मिक उपचार पध्दतीची पाहणी केली.
- बांगलादेशचे स्वातंत्र्यसैनिक मोहमद अन्वरलाल कादरी यांच्या नेतृत्वाखाली बांगला देशातील स्वयंसेवी संस्थाच्या १८ प्रतिनिधीसमवेत दि. ३/१२/०५ रोजी संस्थेस भेट दिली. जन–आरोग्य संसद व आरोग्याचा अधिकार यावर विचाराचे आदानप्रदान झाले.
- अफ्रिकेतील ९ देशातील डॉक्टरांनी युनिसेफच्या नेतृत्वाखाली नवजात अर्भकावरील एकात्मिक उपचार पध्दतिची पाहणी केली.


*****

# हॅलो मेडिकल फाऊंडेशनची प्रकाशने




**यशोदाची गोष्ट :** मुलींना स्वत:विषयी समाजाविषयी व सभोवतालच्या परिस्थितीची जाण यावी म्हणून संस्था किशोरीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेत असते. अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी 'यशोदाची गोष्ट' पुस्तिका लिहिण्यात आली. या पुस्तकाचे लेखन डॉ. जगन्नाथ दिक्षीत, डॉ. अंजली दिक्षीत, डॉ. शांता जोशी व डॉ. शुभांगी अहंकारी यांनी केले असून, संपादन डॉ. जगन्नाथ दिक्षीत, डॉ. शशिकांत अहंकारी व डॉ. क्रांती रायमाने यांनी केले आहे. प्रकाशन विजय तेंडूलकर यांनी केले. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रकरण संवाद रुपात लिहिले आहे. किशोरींचा गट एकत्र बसून या प्रत्येक प्रकरणावर नाटक करुन, एकमेकांना प्रश्न विचारत विविध विषयांचा अभ्यास करु शकतात. या पुस्तकाच्या १७,००० प्रति अंगणवाडीच्या किशोरीशक्ती प्रकल्पासाठी वापरल्या जात आहेत.

---



**बाई मी कात टाकली :** संस्थेतर्फे सन २००० ते २००५ या पाच वर्षाच्या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'स्वयंसिध्दा प्रकल्पा' चा अहवाल या पुस्तिकेत आहे. महिलांच्या आरोग्याबरोबरच महिला सबलीकरणाचे कार्यक्रम जोडणे गरजेचे ठरते. या प्रकल्पातील अनुभव, महिलामध्ये झालेला बदल या संदर्भात मांडणी केली आहे. प्रख्यात लेखिका मा. वीणा गव्हाणकर यांनी या पुस्तकाचे प्रकाशन केले. या पुस्तकाचे लेखन श्री. भारत गजेंद्रगडकर यांनी केले आहे.

---





**माहितीचा अधिकार :** माहिती मिळविण्यासाठी आता केंद्र सरकारने माहितीचा अधिकार २००५ कायदा अंमलात आणला. या कायद्याची माहिती सर्वसामान्य जनतेस व्हावी यासाठी ही पुस्तिका ॲड. देविदास वडगावकर यांनी लिहिली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन सामाजिक कार्यकर्ते मा. सुभाष लोमटे यांनी केले.

---




**स्त्रिया आणि कौटुंबिक हिंसा प्रशिक्षण पुस्तिका :** स्त्रियांचे आरोग्य आणि हिंसाचार यांचा अत्यंत निकटचा परस्पर परिणामकारक संबंध आहे. त्यासाठी या विषयाचे प्रशिक्षण करण्यासाठी ही पुस्तिका तयार करण्यात आली. डॉ. शुभांगी अहंकारी व अरुणाताई बुरटे यांनी या पुस्तिकेचे संपादन केले आहे. मासूम संस्थेने स्त्रिया आणि हिंसा या विषयावर संस्थेच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घेतले त्या प्रशिक्षणावर आधारित ही पुस्तिका आहे.

---




**रोजगार हमी योजना प्रशिक्षण पुस्तिका :** ग्रामीण भागातून गरजू लोकांना रोजगारांची उपलब्धता करुन देण्याची रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत काम करणाऱ्या मजूरांना योजनेच्या सर्व माहितीपासून वंचीत ठेवण्यात येते. बहुतांश मजूर हे अशिक्षित असल्याने त्यांना या योजनेतील तरतूदीची माहिती रंगीत चित्ररुपाने या पुस्तकातून देण्यात आली आहे. या पुस्तकातील सर्व संदर्भ शासनाच्या रोजगार हमी योजना कायद्या अंतर्गत आहेत.



**गीत जागर :** विविध प्रश्नावर काम करत असताना समाज प्रबोधनासाठी कलापथकाचे माध्यमही महत्त्वाचे ठरते. यासाठी परिवर्तनवादी विचाराच्या लोकांनी अनेक गीते रचली आहेत. सर्व लोकापर्यंत ही गीते पोहचावीत या भावनेने ही निवडक गीते संग्रहाच्या रुपात प्रकाशित करण्यात आले आहे.

---

**संजिवनी महिला बचत महासंघ घटना व नियमावली :** महिला सबलकीकरणाच्या कामात बचत गटाचे महत्त्वाचे स्थान आहे. बचत गटांच्या या कामाला दिशा, माहिती, मार्गदर्शन व्हावी यासाठी ही पुस्तिका प्रकाशित केली आहे.



संस्थेच्या कार्याचा माहिती असणारी पुढील पुस्तकेही काही प्रकाशनांनी प्रकाशित केली आहेत.

---


## संस्थेच्या संदर्भातील अन्य प्रकाशने



**भारत वैद्यक डायरी आरोग्याची विकासाची :** भारत वैद्य कार्यकर्त्यांच्या दैनंदिन नोंदीचे संकलन या पुस्तकातून केले आहे. ग्रंथाली वाचक चळवळीने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. भारतवैद्य कार्यकर्त्यांच्या या १०० डायऱ्यांचे गावोगाव जाऊन त्यांना भेटून त्यांचे संपादनाचे काम वर्षा कुलकर्णी यांनी केलेले आहे. या पुस्तकाचे वाचकांनी उत्स्फूर्त स्वागत केले आहे.

---

**खरे खुरे आयडॉल्स :** युनिक फिचर्सच्या समकालीन प्रकाशनांतर्गत १५ ऑगस्ट २००६ रोजी हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील समाजाभिमूख काम करणाऱ्या २५ व्यक्तींच्या कार्याचा परिचय यामध्ये आहे. या पुस्तकामध्ये डॉ. शशिकांत अहंकारी व हॅलो मेडिकल फाऊंडेशन संस्थेच्या कामाचा समावेश आहे.



---



**वेगळ्या वाटांचे प्रवासी :** साकेत प्रकाशन औरंगाबादने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. औरंगाबादचे पुरोगामी चळवळीतील स्तंभलेखक श्री. विजय दिवाण यांनी दै. लोकसत्तामध्ये लिहिलेल्या लेखांचे संकलन यामध्ये आहे. त्यांचा हा स्तंभ आणि पुस्तकाचे चांगले स्वागत झाले. या पुस्तकात आरोग्य सेवेतला निरंकारी डॉ. अहंकारी असा लेख आहे.

*****

हॅलो चळवळीचे प्रमुख उद्गाते आणि सूत्रधार डॉ. शशिकांत आणि डॉ. सौ. शुभांगी अहंकारी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनं ग्रामीण आरोग्य सुधारण्यासाठी हॅलो मेडिकल फाऊंडेशनद्वारे विविध उपक्रम आखले आणि ते यशस्वीरीत्या पार पाडले. त्यातून उभी राहिली ग्रामीण आरोग्याची, ग्रामीण विकासाची एक सशक्त प्रणाली. खरं तर 'ग्रामीण विकासाचा मार्ग ग्रामीण आरोग्यातून जातो' अशी घोषणा तयार व्हावी अशी ही प्रणाली 'वाटा आरोग्याच्या विकासाच्या' या पुस्तकातून नजरेस येते.

– वीणा गवाणकर

